व्याजदरांत खालील प्रमाणे सुधारणा करणेत यावी असे ठरले.

| अ. क्र. | कर्जाचा प्रकार. | सध्याचा व्याजदर | | सुधारील व्याजदर | |
|---|---|---|---|---|---|
| | | बँकेने संस्थेस आकारावयाचा | संस्थेने सभासदा स आकारावयाचा | बँकेने संस्थेस आकारावयाचा | संस्थेने सभासदास आकारावयाचा. |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | **शेती कर्जे :-** | | | | |
| १. | अल्पमुदती शेती कर्जे | | | | |
| | खरिप, रब्बी, तेलबीया डाळी व बागायती कर्जे :- | | | | |
| | अ) रु. २५०००/- पर्यंत | १०% | १३% | १०% | १३% |
| | ब) रु. २५०००/- चे वर व रुपये २.०० लाखपर्यंत | १०% | १४% | १०% | १३% |
| | क) रु. २.०० लाखाचे वर | १०% | १५% | १०% | १४% |
| | फक्त ऊसाचे कर्जविरील दर :- | | | | |
| | अ) रु २५००० पर्यंत | ११% | १४% | १०.५% | १३% |
| | ब) रु २५००० चे वर रु २ लाखापर्यंत | ११% | १५% | १०.५% | १४% |
| | क) रु २ लाखाचे वर | ११% | १५% | १०.५% | १५% |
| २ | मध्यम मुदती शेती रुपांतर फेररुपांतर, द्वितिय फेरआंखणी व गठण कर्जे. (सर्व बँकांना) | | | | |
| | अ) रु २५००० पर्यंत | १०% | १३% | १०% | १३% |
| | ब) रु २५००० चे वर रु २ लाखापर्यंत | १०% | १४% | १०% | १३% |
| | क) रु. २ लाखाचे वर. | १०% | १५% | १०% | १४% |
| ३. | मध्यम मुदती कर्जे :- | | | | |
| | अ) लघु सिंचन - | | | | |
| | डगवेल पंपसेट, ऑईल इंजिन, पाईपलाईन नविन विहिर, विहिर दुरुस्ती, स्प्रिंकलर ड्राप बोअरवेल, ट्युब वेल. इत्यादि. | | | | |
| | रुपये २५००० पर्यंत | ९% | १२.५% | ९% | १२.५% |
| | रुपये २५००० चे वर रु. २. लाखापर्यंत | १०.५% | १३% | १०.५% | १३% |
| | रुपये २. लाखाचे वर. | १०% | १२% | १०% | १२% |
| | ब) इतर शेती कर्जे (कारणांकरिता) दुभती जनावरे, मळणी यंत्र, शेळीमेंढी, बैलजोडी, शेतघर, शेतकुंपण, शेती औजारे इत्यादि (लघुसिंचन सोडून इतर सर्व कर्जे) | | | | |
| | रुपये २५००० पर्यंत | ९% | १२.५% | ९.% | १२.५% |
| | रुपये २५००० चे वर रु २ लाखा पर्यंत | ११% | १३.५% | ११% | १३% |
| | रुपये २ लाखाचे वर | १२% | १४% | ११% | १४% |
| ४. | मध्यम मुदती कर्जे :- एकात्मिक ग्रामीण विकास योजना (आयआरडीपी/गोबर गॅस) | ९% | १२.५% | ९% | १२.५% |
| ५. | कृषि यांत्रिकी सुविधा (ट्रॅक्टर, पावर टिलर) | १२% | १३% | १२% | १३% |
| ६. | प्रकल्पाअंतर्गत कर्जपुरवठा.- | | | | |

| १ | २ | | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|---|
| | (नाबार्ड मंजूर योजना) पडित जमीन विकास, उपसाजलसिंचन, कुक्कुटपालन, शेळीमेंढी संगोपन, डेअरी प्रकल्प, फलोद्यान, फुलशेती. | | | | | |
| | अ) रु.२५००० पर्यंत | | ११.५% | १२.५% | ११% | १२.५% |
| | ब) रु.२५००० ते रु.२ लाखापर्यंत | | ११.५% | १४% | ११% | १३% |
| | क) रु.२ लाखाचे वर. | | ११.५% | १५% | ११% | १५% |
| ७. | मध्यम मुदती भाग खरेदी करण्यासाठी कर्जे – | | १४% | १७% | १४% | १७% |
| ८. | जीप खरेदीकरिता कर्ज योजना (शेती सहकारी संस्थामार्फत) | | १३% | १५% | १३% | १५% |
| ९. | बिगर शेती संस्थांना आकारावयाचे व्याजदर :- | | | | | |
| | १. अ) लघु औद्योगिक व स्वतंत्ररित्या नमुद न केलेल्या इतर सर्व बिगर शेतकी संस्था | अ) क्लीन कॅश क्रेडीट | १८% | – | १८% | – |
| | | ब) नजर गहाण कॅ.क्रे. | १७% | – | १७% | – |
| | | क) ताबेगहाण कॅ.क्रे. | १६.५% | – | १६.५% | – |
| | | ड) मांडवली कर्ज (म.मु./दि.मु.) | १६% | – | १६% | – |
| | | ई) फेरताबेगहाण ब्रिज लोण (तात्पु.कर्ज) | १७% | – | १७% | – |
| | ब) प्रक्रिया व मार्केटींग १) रु. २ कोटीचे आंतील मंजुर मर्यादा | अ) क्लिन कॅश क्रेडीट | १७% | – | १७% | – |
| | | ब) नजरगहाण कॅ.क्रे. | १६.५% | – | १६.५% | – |
| | | क) ताबेगहाण कॅ.क्रे. | १६% | – | १६% | – |
| | | ड) मांडवली कर्ज (म.मु./दि.मु.) | १५% | – | १५% | – |
| | | ई) फेरताबेगहाण ब्रिज लोण (तात्पुकर्ज) | १६% | – | १६% | – |
| | २) रु. २ कोटीचे वरील मंजूर मर्यादा | अ) क्लिन कॅश क्रेडीट | १६% | – | १६% | – |
| | | ब) नजरगहाण कॅ.क्रे. | १५.५% | – | १५.५% | – |
| | | क) ताबेगहाण कॅ.क्रे. | १५% | – | १५% | – |
| | | ड) मांडवली कर्ज (म.मु./दि.मु.) | १५% | – | १५% | – |
| | | ई) फेरताबेगहाण ब्रिज लोन (तात्पु. कर्ज) | १६% | – | १६% | – |
| | २. पगारदार सेवकांच्या सह. पत संस्था – | अ) क्लिन कॅश क्रेडीट | १६.५% | – | १६.५% | – |
| | | ब) मध्यम मुदती (फिक्स्ड लोन) | १६% | – | १६% | – |
| | ३. ब्रिज लोन (अंतरीम सर्व प्रकारचे) | | १७% | – | १७% | – |
| | ४. विणकर संस्था. | अ) हातमाग कॅश क्रेडीट | ११% | – | ११% | – |
| | | ब) यंत्रमाग कॅ. क्रेडीट | १२% | – | १२% | – |
| | ५. नागरी सह. बँका – | कॅश क्रेडीट | १४% | – | १४% | – |
| | ६. अर्बन को-ऑप संस्था – | कॅश क्रेडीट | १६% | – | १६% | – |
| | ७. ग्रामीण कारागीर – बलुतेदार संस्था | डिपोझिट व कॅश क्रेडीट कर्ज. | | | | |
| | | अ) रु.२५००० पर्यंत | ९% | १२.५% | ९% | १२.५% |
| | | ब) रु.२५००० चे वर | ११.५% | १४% | ११.५% | १४% |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| १० | वैयक्तिक कर्जावरील व्याजदर | | | | |
| | १. सुवर्ण तारण कर्ज अ) सर्वसाधारण | १६% | – | १६% | – |
| | ब) शेतकऱ्यांसाठी (७/१२ चा उतारा घेऊन) | १४% | – | १४% | – |
| | २. वैयक्तिक ओव्हर ड्राफ्ट (वैयक्तिक बचत खात्यावरील) | १८% | – | १८% | – |
| | ३. वैयक्तिक ग्राहकोपयोगी कर्ज | १८% | – | १८% | – |
| | ४. वाहन खरेदी (वैय. लाभार्थींना खाजगी उद्योगाकरिता) | १६% | – | १६% | – |
| | ५. रोड ट्रान्सपोर्ट (सीडबी/नाबार्ड योजने अंतर्गत) | १६% | – | १६% | – |
| | ६. राष्ट्रिय बचत प्रमाणपत्रे (एन.एस.सी.) | १७% | – | १७% | – |
| | ७. वैयक्तिक फर्म कंपनी इत्यादि व्यवसायासाठी – | | | | |
| | अ) क्लिन कॅश क्रेडीट | १७.५% | – | १७% | – |
| | ब) नजरगहाण कॅश क्रेडीट | १६.५% | – | १६% | – |
| | क) तारणगहाण | – | – | १५% | – |
| | ड) मुदती कर्ज | – | – | १५% | – |

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १३ - महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने सुचविलेल्या एक रकमी कर्जपरतफेड योजनेबाबत माहिती देणे.

ठराव क्रमांक १३ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना थकित कर्जाबाबतचे नियम मार्च १९९८ पासून लागू केले असून, बँकांना वसूल न झालेल्या व्याजाची/थकित कर्जाची तरतुद करावी लागत असते. यामुळे बँकांच्या अनुत्पादक संपत्तीत (एन.पी.ए.) वाढ झाल्याने कांही बँकांना तोटा सहन करावा लागत आहे. कांही बँका आर्थिक अडचणीत आल्या असून कांही बँकांचे स्वनिधी एन.पी.ए. तरतुदीमुळे नष्ट झालेत. सदर रकमा वसूल होण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने शासनाकडे एक रकमी कर्ज परतफेड योजना तयार करून मान्यतेसाठी पाठविली आहे. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदर योजनेबाबत केलेल्या शिफारशीचा विचार करून सहकारी बँक व राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना एक रकमी परतफेड योजनेचे पालन करण्याचे महाराष्ट्र शासनाचे निर्देश आहेत. याबाबत विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था नागपूर यांचे पत्र बँकेला प्राप्त झाले आहे. याच अनुषंगाने महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे दिनांक १९.२.२००१ चे पत्र बँकेला आलेले आहे.

सदर योजनेचे स्वरुप खालील प्रमाणे आहे.

१) महाराष्ट्र राज्य सहकारी बँक व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांसाठी

एक रकमी परतफेड योजना दिनांक 30 जून 2001 पर्यंत खुली राहील.

2) एक रकमी परतफेडीसाठी (अ) शेतीसाठी कर्ज दिले असल्यास रुपये 1.00 लाख पर्यंतचे कर्ज ग्राह्य धरण्यांत यावे (ब) बिगर शेतीसाठी खरेदी विक्री संघ/ ग्राहक संस्था/औद्योगिक संस्था/कुक्कुटपालन संस्था इत्यादिसाठी दिलेले रूपये 10.00 लाखापर्यंतचे कर्ज (क) आणि प्रक्रिया संस्थांना दिलेले रूपये 2.00 कोटी पर्यंतचे कर्ज (ड) सहकारी कारखाना/सुत गिरण्या इत्यादि साखरे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी भांडवली कर्ज भागविणे साठी मध्यम मुदती कर्ज अंतरीम मुदती कर्ज ग्राह्य धरण्यांत यावे.

3) पांच वर्षावरील थकित कर्जाचा विचार व्हावा.

4) कर्जाची परतफेड वसुली करतांना मुद्दल व व्याज मिळून होणाऱ्या रकमेच्या 35% रक्कम एक रकमी परतफेड योजनेसाठी विचारांत घ्यावी. व उरलेली 65% रक्कम 3 वर्षात समान हप्त्यांत किंवा 36 मासीक हप्त्यांत वसुल करावी.

5) शेती कर्जावर 12% व्याज दर आकारण्यांत यावा आणि शेती संस्थांना खेळत्या भाग भांडवलासाठी दिलेले कर्ज व प्रक्रिया संस्थांच्या प्रकल्पासाठी दिलेल्या कर्जावर प्रचलित दरापेक्षा 1% कमी व्याजदर आकारावा.

6) हेतुपुरस्कर थकबाकीदारांचा या योजनेत समावेश करण्यांत येवू नये.

7) कापसि फंड रुपये 10.00 कोटी पर्यंतचा निर्माण करावा.

8) राज्य सहकारी बँकेने सुचविलेल्या कापसि फंडामध्ये शासन अर्थ सहाय्य देणार नाही. बँकांनी त्यांच्या स्वभांडवलातून कापसि फंड तयार करुन योजना राबविण्यांत हरकत नाही.

वरीलप्रमाणे योजना तयार करुन राबविण्यांत यावी अशी सुचना मा. सहकार आयुक्त यांचेकडून प्राप्त झाली. तथापी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे पत्र क्र. 688/2000-2001 दिनांक 20/21-3-2000 तसेच नाबार्डचे दिनांक 20.2.2001 चे पत्र नुकतेच प्राप्त झाले आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने पुरस्कृत केलेल्या सदर योजने संदर्भात रिझर्व बँकेकडून मार्गदर्शक सुचना प्राप्त होईपावेतो महाराष्ट्र शासनाची एक रकमी कर्ज परतफेड योजना राबवू नये असे नाबार्डने सुचविले आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने सुचविलेल्या एक रकमी कर्ज परतफेड योजना रिझर्व बँकेकडून मार्गदर्शक सुचना प्राप्त होईपावेतो राबविण्याचे थांबविण्यात यावे. एक रकमी कर्ज परतफेड योजने बाबत दिलेल्या माहितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

विषय क्रमांक ७४ - मा० अध्यक्ष यांचे परवानगीनुसार वेळेवर येणारे विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ७४(१) - महाराष्ट्र सहकारी संस्थांचे कायद्यानुसार कर्ज उभारण्याची वाढीव मर्यादेचा वाढवून घेण्यासाठी मा० जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांचे कडे अर्ज करणे.

ठराव क्रमांक ७४(१) - मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, महाराष्ट्र सह० कायदा कलम ८३ नियम ३५ अनुसार भाग भांडवल + बचत फंड + इमारत निधी - संचयीत तोटा याच्या १२ पट बँकेची निधी स्विकारण्याची क्षमता आहे. ही मर्यादा ३० पटीपर्यंत वाढविण्यासाठी मा० जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था नागपूर यांनी दिलेल्या परवानगीची मुदत दिनांक ३०-६-२००१ ला संपत आहे.

दिनांक २३.२.२००१ चे ताळेबंदानुसार ठेवी रुपये ४६९९०.३० लाख आणि कर्ज व ओव्हर ड्राफ्ट रुपये १३६७.५० लाख अशी एकूण रुपये ४८३५७.८० लाख बाकी आहे. तसेच भाग भांडवल रुपये १०९६.७९ लाख + बचत फंड रुपये ३४६.०२ लाख + इमारत फंड रुपये २४२.०९ लाख असे एकूण रु. १६८४.९० लाख - तोटा रुपये निरंक याच्या ३० पट म्हणजे रुपये ५०५४७.०० लाख निधी स्विकारण्याची मर्यादा आहे. सन २००१-२००२ ह्या वर्षात बँकेच्या ठेवीत आणि कर्जात होणारी वाढ विचारांत घेता १२ पटीपर्यंत कायद्यानुसार असलेली मर्यादा आणि दिनांक ३०-६-२००१ पर्यंत मंजूरी मिळालेली मर्यादा या दोन्ही मर्यादा अपुऱ्या पडत असल्याने बाहेरील कर्ज उभारण्याची मर्यादा ३५ पट पर्यंत वाढवून मागणेसाठी मा० जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करावी लागेल.

विषयावर सविस्तर चर्चा होउन सन् २००१-०२ ह्या वर्षात बँकेच्या ठेवीत आणि कर्जात होणारी वाढ विचारांत घेता दिनांक ३०.६.२००१ पर्यंत मंजूरी मिळालेली मर्यादा अपूरी पडत असल्याने बाहेरील कर्ज उभारण्याची मर्यादा भाग भांडवल + बचत फंड + इमारत निधी - संचयीत तोटा याच्या ३५ पर्यंत दिनांक ३०-६-२००२ पर्यंत वाढवून देण्यास मा० जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करण्यांत यावी. यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे अधिकार मा० अध्यक्ष व सरव्यवस्थापक यांना देण्यांत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ७४(२) - सन २००१-२००२ सालाकरिता अल्पमुदत शेती कर्ज मर्यादा रुपये ३५.०० कोटी मंजूर करणेकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी

बँकेकडे प्रस्ताव सादर करणे.

ठराव क्रमांक ७८(२) - मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, मागील वर्षी रुपये २०.०० कोटीची अल्पमुदत शेती कर्ज मर्यादा मंजूर झाली होती आणि यावर रुपये २०.०० कोटीची उचल केली होती. चालु वर्षाति खते, बियाणे, औषधी यांचे वाढीव भाव विचारांत घेता रुपये ५२.०० कोटीपर्यंत लघु कर्जाचे वाटप होईल असा अंदाज आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून रुपये ३५.०० कोटीची अल्पमुदत शेती कर्ज मर्यादा मंजूर करण्याकरिता ठराव करुन प्रस्ताव पाठवावा लागेल.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून रुपये ३५.०० कोटीची अल्पमुदत शेती कर्ज मर्यादा मंजूर करण्याकरिता खालील प्रमाणे ठराव करुन प्रस्ताव पाठविण्यांत यावा असे ठरले.

## RESOLUTION

Resolved to borrow during the year 2001-02 an amount Rs.3500.00 Lakhs (Rupees Thirtyfive hundred Lakhs only) from the Maharashtra State Cooperative Bank ltd; and request the State Cooperative Bank to apply for a credit limit for a like sum to the National Bank for Agriculture and Rural Development under section 21(1)(i) read with section 21(3)(a) or 21(3)(b) of the NABARD Act 1981 for financing seasonal Agriculture operations as under.

| | |
|---|---|
| 1) For financing OPP - - - | Rs. 200.00 Lakhs. |
| 2) For financing NPDP - - | Rs - - - - |
| 3) For financing under DTP - - | Rs. 20.00 Lakhs. |
| 4) For financing other Crops - - | Rs.3280.00 Lakhs |
| Total | Rs.3500.00 Lakhs. |

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ७८(३) - वैयक्तीक व्यवसाय कर्ज अंतर्गत मे० धिरज कुमार ॲंड कंपनी यांनी त्यांचे मिरची खरेदी व्यवसायासाठी दिलेल्या कॅश क्रेडिट कर्ज मर्यादा मागणी अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक १४(३) – मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, मेसर्स धिरजकुमार अँड कंपनी, किराणा ओळ, इतवारी, नागपूरचे प्रोप्रायटर श्री धिरजकुमार हरीरामजी अग्रवाल, नागपूर यांनी मिरची खरेदी विक्री व कमिशन एजंटचे व्यवसाया करिता रुपये ३००.०० लाख कॅश क्रेडीट कर्ज मर्यादा मागणी बाबत शाखा गांधीबाग मार्फत कर्जप्रस्ताव बँकेस प्राप्त झाला आहे. सदर फर्म प्रोप्रायटरी फर्म असून नागपूर कृषिउत्पन्न बाजार समितीचे कळमना मार्केट यार्ड येथील शॉप क्र.४५ मध्ये शाखा कार्यालय आहे. सदर व्यवसायाकरिता फर्मने नोंदणी केली आहे. नोंदणी क्रमांक १-८-४४-२६६५ आहे. नागपूर कृषिउत्पन्न बाजार समितीकडून सन २००६ पर्यंत मिरची अडत व्यवसायासाठी "अनुज्ञप्ती" घेतली आहे. केंद्रीय विक्रीकर नियमा अंतर्गत फर्मने नोंदणी केली असून नोंदणी क्रमांक ४४०००२/सी/२१९७ आहे.

सदर व्यवसायांत शेतकऱ्यांकडून नगदीने अथवा ॲडव्हान्स घेऊन मिरची खरेदी करित असते. सदर मालाची विक्री करतांना व्यापाऱ्यांकडून नगदी रक्कम लगेच मिळत नाही. ६ ते ८ महिनेपर्यंत उधारी बाकी राहत असल्याने मोठ्या प्रमाणांत भांडवलाची गरज भासत असल्यामुळे बँक कर्जाची आवश्यकता आहे. अर्जदाराला सध्या नागपूर नागरीक सहकारी बँकेकडून रुपये ९०.०० लाखाची कर्ज मर्यादा मंजूर आहे. वाढता व्यवसाय विचारांत घेऊन कमी पडत असलेली मर्यादा केलेल्या मागणी प्रमाणे वाढवून देण्यास बँकेनी असमर्थता दर्शविली. त्यामुळे मे. धिरजकुमार अँड कंपनीचे प्रोप्रायटर श्री धिरजकुमार अग्रवाल यांनी आपल्या बँकेकडे कर्ज मागणी केली आहे. सध्या दि.२३.३.२००७ ला नागपूर नागरीक सहकारी बँकेची रुपये ८६.३९ लाख कर्जबाकी आहे. आपण मंजूर केलेल्या कर्ज मर्यादेतून नागपूर नागरीक सहकारी बँकेच्या कर्जाची परतफेड करून व तेथील सर्व व्यवहार बंद करून आपल्या बँकेमार्फत फर्म व्यवहार करणार आहे.

सदर कर्जाचे सुरक्षिततेकरिता अर्जदार व २ जामिनदार (अर्जदाराचे भाऊ) यांचे संयुक्त मालकी हक्कातील धंतोली, नागपूर येथील घर क्र.२१६/अ मुल्य रुपये १४.३० लाख तसेच मे. पंकजकुमार धिरजकुमार या फर्मचे मालकी हक्कातील सक्करदरा आयुर्वेदिक ले आउट येथील घर क्र.२६५९ मुल्य रुपये १४.३० लाख बँकेला तारणांत देणार आहे.

कर्ज प्रकरणासोबत अर्जदाराने सादर केलेले प्रोजेक्ट प्रोफाईल तसेच सर्व आर्थिक पत्रकांची बँकेच्या पॅनेलवरील चार्टर्ड अकांउंटंट श्री ठाकरे यांनी छाननी केली असून, त्यांचे अहवालानुसार कर्ज प्रकरण आर्थिक व तांत्रिकदृष्ट्या सक्षम आहे. सदर प्रकरणांत साठा मालाचे २५% व

६ महिन्याचे आंतील येणे उधारबाकीच्या ४०% मार्जीन राखून कर्जाची उचल देण्याचे अटीवर रुपये ७५०.०० लाखापर्यंत कॅश क्रेडीट कर्ज मर्यादा मंजूर करण्यास अभिप्राय दिलेला आहे.

सदर कर्जाकरिता तारणांत देत असलेल्या मालमत्तेचे मुल्यांकन पॅनेल वरील आर्किटेक्ट श्री चिंचमलातपूरे यांनी केले असून धंतोली, नागपूर येथील घर क्र. २१९/अ व सक्करदरा आयुर्वेदीक कॉलेज लेआऊट येथील घर क्र. २६५९ या दोन्ही संपत्तीचे एकूण मुल्य रुपये १८८.६० लाख आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन मे. धिरजकुमार अँड कंपनी, नागपूर या प्रोप्रायटरी फर्मने मिरची खरेदी विक्रीचे व्यवहारासाठी रुपये ७५०.०० लाख कॅश क्रेडीट कर्ज मर्यादा मंजूर करण्यांत येत आहे. कर्ज मर्यादेचा वापर करण्यापूर्वी मंजुरीसाठी सादर केलेला कर्ज मागणी प्रस्ताव तांत्रिक दृष्ट्या व आर्थिक दृष्ट्या छाननीमध्ये सक्षम आढळून आल्याने सदर कर्जाकरिता देऊ केलेले धंतोली, नागपूर घर क्र. २१९/अ व सक्करदरा आयुर्वेदीक कॉलेज लेआउट येथील घर क्र. २६५९ तारणांत घेऊन, नागपूर नागरिक सहकारी बँकेचे कर्ज परत करण्यात यावे व त्यानंतर गहाणांत असलेली मालमत्ता घर क्र. २१९/अ बोझारहित करुन दोन्ही घर मुल्यांकन रुपये १८८.६० लाखाची मालमत्ता बँकेला रजिस्टर्ड गहाण करून घेण्यांत यावी.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक १४(४) - मे. मुरली अॅग्रो प्रोडक्टस् लिमी; नागपूरच्या न्यूज प्रिंट उभारणीसाठी रुपये ६००.०० लाख मुदती कर्ज तसेच वर्कींग कॅपीटल कारिता रुपये 300.00 लाख कॅश क्रेडीट कर्ज मर्यादा मागणी अर्जाबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक १४(४) – मे. मुरली अॅग्रो प्रोडक्टस् लिमी; नागपूर ह्या पब्लिक लिमी, कंपनीने मौजा वडोदा येथे नव्याने उभारण्यांत येत असलेल्या कंपनीचे न्यूज प्रिंट पेपर युनिटसाठी भांडवली खर्चाकरिता रुपये ६००.०० लाख मुदती कर्ज तसेच युनिट चालविण्यासाठी खेळते भांडवलाकरिता रुपये 300.00 लाख कॅश क्रेडीट कर्ज मर्यादा मागणीकरिता कर्ज प्रस्ताव बँकेस प्राप्त झाला आहे. सदर कंपनीची कंपनी कायद्या अंतर्गत १९९० मध्ये नोंदणी झाली असून नोंदणी क्रमांक ११-५८२७१ आहे.

सदर कंपनीचे सर्व संचालक एकाच कुटुंबातील एकाच आडनावाचे असून एक प्रतिनिधी सिकॉमचे पदसिद्ध प्रतिनिधी आहेत. कंपनीचे सर्व व्यवहार एकाच ठिकाणावरून होत असून कंपनीचे सर्व युनिट्सची एकच बॅलेन्स शिट आहे. सभासदांची नांवे खालील प्रमाणे आहेत.

१. श्री शोभागमल मालु - अध्यक्ष, २) श्री सत्यनारायण मालु - कार्यकारी संचालक ३) श्री नंदलाल मालु - संचालक, ४) श्री बजरंगलाल मालु - संचालक ५) श्री लालचंद मालु - संचालक, ६) श्री सुनिलकुमार मालु - संचालक ७) श्री व्ही.एन. शेगोकर - सिकॉमचे प्रतिनिधी पदसिद्ध.

सदर कंपनीचे सद्या खालीलप्रमाणे चार युनिट्स् कार्यरत असून, त्यांनी सिकॉम, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शिक्षक सहकारी बँक, ओरीएन्टल बँक ऑफ कॉमर्स, स्टेट बँक ऑफ इंडिया ह्या वित्त संस्थाकडून मुदती कर्ज व कॅश क्रेडीट कर्ज घेतलेले आहे.

| | | |
|---|---|---|
| १. ॲग्रो युनिट<br>साल्वंट प्लांट एमआयडीसी<br>इंडस्ट्रीयल एरीया, हिंगणा रोड, नागपूर. | - | रूपये ११३०.०० लाख |
| २. ॲग्रो युनिट<br>मौजा- बोरगांव तालुका कामठी | - | रूपये ४७५.०० लाख |
| ३. क्राफट पेपर युनिट<br>मौजा पाटणसावंगी ता. सावनेर. | - | रूपये ६६६.०० लाख. |
| ४. डुप्लेक्स पेपर युनिट -<br>वडोदा ता. कामठी | - | रूपये ११०६.०० लाख. |

एकूण कर्ज रूपये ३३९७.०० लाख.

वडोदा येथील डुपलेक्स पेपर युनिटला लागून असलेल्या १५ एकर जागेत कंपनी नविन न्युजप्रिंट पेपर युनिट सुरु करीत असून, युनिटचे बांधकामास ४ महिन्यापूर्वी सुरूवात केली आहे. सदर युनिट उभारणीकरिता प्रकल्प अहवालासह कंपनीने कर्जमागणी प्रस्ताव कंपनीची आर्थिक पत्रके व इतर आवश्यक कागदपत्रे जोडून बँकेस सादर केला आहे. सादर केलेल्या अहवालानुसार एकूण प्रकल्प खर्च व त्याकरिता लागणारे भांडवल निधी उपलब्धता खालील प्रमाणे राहणार आहे.

खर्च तपशिल -

| | |
|---|---|
| १. जमीन व जमीन विकास | रूपये ३४.०० लाख |
| २. इमारत व बांधकाम | रूपये ११६.०० लाख |
| ३. प्लांट व माशिनरी | रूपये १००१.०० लाख |
| ४. सुरूवातिचा व उत्पादनापूर्वीचा खर्च | रूपये ६०.०० लाख |
| ५. आकस्मिक अनुषंगिक खर्च | रूपये ३०.०० लाख |

६. इतर संपती — रुपये ७५.०० लाख.

७. खेळते भांडवलासाठी मार्जीनमनी — रुपये १०४.०० लाख

एकुण रुपये १४४०.०० लाख

निधी उपलब्धता तपशिल -

१. स्वतःचे भांडवल — रुपये ३००.०० लाख

२ मित्र व नातेवाइक यांचेकडून — रुपये २४०.०० लाख

३. बँक मुदती कर्जे — रुपये ९००.०० लाख

एकुण रुपये १४४०.०० लाख

सदर कर्जाचे सुरक्षितते करिता बँकेला कंपनी खालिलप्रमाणे मालमत्ता तारणांत देणार आहे असे कंपनीने कळविले आहे.

१. सदर प्रकल्पातून निर्माण होणारी अंदाजे रुपये १३००.०० लाखाची संपूर्ण मालमत्ता बँकेला तारणात देणार आहे.

२ याशिवाय सह तारण म्हणून खालिलप्रमाणे असलेली मालमत्ता देण्यास संमती दिलेली आहे.

अ) मौजा उमरी ता. कामठी येथील भंडारा रोडवरील सर्वे नं. ३८/१ मधील रु. ३७.५५ लाख किंमतीची १०८ हेक्टर जमीन.

ब) एमआयडीसी, हिंगणा रोड येथील प्लॉट क्रमांक यु.१२७ चीजमीन व बांधकाम, प्लॅंट व मशिनरीसह रुपये ९०२.१९ लाख मुल्य असलेला रिफायनरी युनिट.

तारणांत देण्यांत येत असलेल्या वरील रु.९३९.७४ लाख मालमत्तेचे बँकेच्या पॅनेलवरील व्हॅल्युअर यांचेकडून मुल्यांकन करुन घेण्यांत आले आहे. बँकेचे पॅनेलवरील ॲडव्होकेट श्री डोइफोडे यांचेकडून सदर मालमत्तेच्या सर्च रिपोर्टनुसार वरील दोन्ही मालमत्ता बोझाविरहीत आहेत. तथापी क्र. २(अ) च्या मालमत्तेवर ५ सदस्यांचे संयुक्त हक्क आहे. क्रमांक २(ब) चे युनिट एमआयडीसी चे प्लॉटवर असून लिजडिड झाले नसल्यामुळे सद्यस्थितीत मालकी हक्क एमआयडीसी कडे आहे. तथापी त्यांनी परवानगी दिलेली आहे.

कंपनीने सादर केलेला प्रकल्प अहवाल व सर्व आर्थिक पत्रकाची छाननी बँकेचे पॅनेलवरील चार्टर्ड अकांऊंटंट श्री.पी.एस.ठाकरे यांनी करुन प्रकल्प आर्थिक व तांत्रिक दृष्ट्या सक्षम असल्याचे कळविले आहे. तथापी कंपनीच्या सर्व युनिटकरिता कर्ज पुरवठा केलेल्या बँका व वित्तीय संस्थांकडून कंपनीचे उपरोक्त नविन युनिट करिता आपल्या

बँकेने कर्जपुरवठा करण्यास त्यांची हरकत नसल्याबाबतचे दाखले घेण्यास कळविले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन सदर कर्ज प्रकरणास तत्वता मान्यता देण्यात आली तथापी खालील बाबींची पूर्तता करून घेवुन कर्ज प्रकरणांत निधी उपलब्ध करून देण्याचे दृष्टीने अंतिम मंजुरीकरिता कर्ज प्रकरण मा. कर्ज उप-समिती पुढे ठेवण्यांत यावे असे सर्वानुमते ठरले.

१) कंपनीचे एमआयडीसी. हिंगणा रोड येथील रिफायनरी युनिट या कर्जाकरिता सहतारणांत देणार आहे. तथापी सदर युनिटला एमआयडीसी कडून मिळालेल्या प्लॉटचे लिजडिड करून घेण्यांत यावे.

२) श्री चारी यांनी दिलेल्या मुल्यांकन अहवालाप्रमाणे सदर रिफायनरी युनिटच्या प्लँट व मशिनरीजचे खरेदी मुल्य रुपये ५.५५ कोटी आणि आजचे बाजारमुल्य रुपये ७.६६ कोटी दिलेले आहे. तथापी प्लँट व मशिनरी आजच्या बाजार-भावाने होणारे मुल्यांकन ग्रहीत धरणे उचित होणार नाही त्यामुळे मशिनरीचा घसारा विचारांत घेवुन मशिनरीचे प्रत्यक्ष मुल्य विचारात घ्यावे व त्याप्रमाणे अहवाल मागवावा.

३) कर्जाचे सुरक्षिततेसाठी बँकेला सहतारण देण्यांत येणारी संपूर्ण मालमत्तेचे तसेच सदर प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या संपूर्ण मालमत्तेचे रजिस्टर्ड गहाणखत करून घ्यावे.

४.) कंपनीच्या सहयोगी युनिटकरिता इतर बँका व वित्तीय संस्थांनी कर्जपुरवठा केलेला आहे. सदर युनिटला आपल्या बँकेने कर्जपुरवठा करण्यास त्यांची हरकत नसल्याबाबतचे दाखले कर्ज वितरणापूर्वी घेण्यांत यावे.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ७८ (५) - बँकेच्या चाचेर शाखेला कन्हान शाखेशी संलग्न असलेल्या सेवा सहकारी संस्थांचा व्यवहार तबदील करणे बाबत..

ठराव क्रमांक ७८ (५) - मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेची नविन शाखा चाचेर येथे दिनांक १/४/२००१ पासून सुरु करण्यात आली आहे. शेतकऱ्यांचे सोयीचे दृष्टीने खालील सेवा सहकारी संस्थांनी कन्हान शाखे-तील संपूर्ण व्यवहार चाचेर शाखेला तबदील करण्याकरिता बँकेला विनंती केली आहे. तद्वतच खालील संस्थांचे व्यवहार चाचेर शाखेला दिनांक १/४/२००१ पासून तबदील करण्यांत यावे अशी सुचना श्री गुजर, संचालक यांनी केली.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन कन्हान शाखेतील खालील संस्थांचे

संपूर्ण व्यवहार चान्येर शाखेला दिनांक १.४.२००१ पासून तबदिल करणेत यावे असे ठरले.

१. चान्येर सेवा सहकारी संस्था मर्या; चान्येर
२. मेरला सेवा सहकारी संस्था मर्या; मेरला
३. गांगनेर सेवा सहकारी संस्था मर्या; गांगनेर
४. निसतखेडा सेवा सहकारी संस्था मर्या; निसतखेडा
५. आव्हिचान्येर सेवा सहकारी संस्था मर्या; आव्हिचान्येर
६. खंडाळा सेवा सहकारी संस्था मर्या; खंडाळा

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १४(६) - ३ टक्के (%) गाळ्याची रक्कम परत देतांना बिगर शेतकी कर्ज खाते ऐवजी व्याज गाळा परतावा खाते संबोधून त्यावर व्याज न आकारणे बाबत विचार करणे.

ठराव क्रमांक १४(६) - मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, सद्यस्थितीत शेतकी संस्थांना व्याज गाळ्या पोटी देण्यात येणारी ३% रकमेचा परतावा बिगर शेती कर्ज म्हणून संबोधला जातो. शेतकी संस्थांना बँकेकडून आकारण्यात येणारे व्याज व सोसायटीचे सभासदांना सोसायटीकडून आकारण्यांत येणारे व्याज ह्यातील तफावत साधारणतः ३% असते. आपली बँक व्याजापोटी संस्थेचे सभासदांना आकारलेले व्याज संपूर्णपणे वसुल करून त्यावर जॉईन्ट फंड रक्कम बिगर शेती कर्ज म्हणून ३% व्याजाची रक्कम सोसायटीला बिगरशेती कर्ज देवुन परत करते व त्यावर १०% व्याज आकारणी करते. तथापी ३% गाळ्याच्या रकमेवर बिगर शेती कर्ज संबोधून व्याज आकारणी करणे बरोबर वाटत नाही. तरी बिगर शेती कर्ज खाते ऐवजी व्याज गाळा परतावा खाते असे संबोधण्यांत यावे. व त्यावर व्याज आकारणी करु नये असे वाटते.

विषयावर सविस्तर चर्चा होवुन ३% गाळ्याची रक्कम जमा करण्यांत येणाऱ्या बिगर शेती कर्ज खात्याला "व्याज गाळा परतावा खाते" असे संबोधण्यांत यावे. व सदर खात्यावर व्याज आकारणी करण्यांत येवू नये असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

मा. अध्यक्ष यांचे परवानगीने झालेल्या चर्चेत श्री र. गो. बंग

संचालक म्हणाले की, शासनाचे निर्देशाप्रमाणे रुपांतरासाठी बँकेने कार्यक्रम तयार केला आहे काय? यावर बँकेचे सरव्यवस्थापक यांनी रुपांतरासाठी बँकेने परिपत्रक काढून शाखांना पोहचविले आहेत व रुपांतरासाठी प्रकरण मागविले आहेत. अशी माहिती दिली. यानंतर नागपूर विद्यापिठाचे व्यवस्थापक मंडळावर बँकेचे संचालक श्री. बबनराव तायवाडे यांची निवड झाल्याबद्दल पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

यानंतर सभेसमोर कोणतेही विषय नसल्याने सभेला उपस्थित असलेल्या मान्यवरांचे आभार मानून मा. अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सरव्यवस्थापक अध्यक्ष

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटीव्ह बँक मर्या., नागपूर.

बँकेच्या मा. संचालक मंडळाची सभा बुधवार दिनांक ६.६.२००१ रोजी दुपारी २.०० वाजतां बँकेच्या मुख्य कार्यालयातील 'सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांत बँकेचे अध्यक्ष मा. श्री. सुनिल केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

-उपस्थित-

१. मा. श्री. सुनिल केदार — अध्यक्ष
२. मा. सौ. आशाताई महाजन — उपाध्यक्षा
३. मा. श्री. र. पां. गावंडे — संचालक
४. मा. श्री. र. गो. बंग — "
५. मा. श्री. भा. चं. शहाणे — "
६. मा. श्री. अ. रा. गुप्ता — "
७. मा. श्री. व. भा. वांढे — "
८. मा. श्री. अ. य. गुजर — "
९. मा. श्री. सं. लि. चोरे — "
१०. मा. श्री. शा. ग. धवड — "
११. मा. श्री. वि. रा. हलके — "
१२. मा. श्री. ना. र. जीभकाटे — "
१३. मा. श्री. वि. वि. निमजे — "
१४. मा. श्री. ग. के. शाहीर — "
१५. मा. श्री. मो. वि. निमजे — "
१६. मा. श्री. र. व्यं. निमजे — "
१७. मा. श्री. ब. भा. तायवाडे — "
१८. मा. श्री. अ. शं. धार्मिक — "
१९. मा. श्री. व. क. पारशिवनीकर — "
२०. मा. श्री. चं. तु. समर्थ — "
२१. मा. सौ. स्मिताताई कुंभारे — संचालिका
२२. मा. सौ. कु. ग. किंमतकर — "
२३. मा. श्री. एस. बी. पाटील, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर
२४. मा. श्री. बी. व्ही. असवार, विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सह. संस्था (बँक) नागपूर.
२५. मा. श्री. एल. जी. चौधरी, कर्मचारी प्रतिनिधी
२६. मा. श्री. व्ही. जी. शहाणे. — "
२७. मा. श्री. एन. एन. चौधरी — सरव्यवस्थापक

-अनुपस्थित-

१. मा.श्री. चं. ल. कोल्हे. संचालक

२ मा.श्री. आ. र. देशमुख "

३. मा.श्री. वि. जा. राउत "

४. मा.श्री. मु. भि. पन्नासे "

५. मा. अध्यक्षा, जील्हा परिषद, नागपूर

६. मा.श्री.अ.ना. पोरेड्डीवार प्रतिनिधी मह.राज्य सह.बँक मर्या. मुंबई.

७. मा. सहाय्यक महाप्रबंधक, नाबार्ड, नागपूर.

८ मा. विभागिय अधिकारी, महा.राज्य सह.बँक म. विभागिय कार्यालय, नागपूर.

---

सभेचे सुरुवातीला मा.श्री. ग. के. शाहिर, संचालक यांनी बँकेचे माजी संचालक श्री बापूरावजी नारायणराव दियेवार स्वातंत्र्य संग्राम सेनानी यांचे दिनांक २९.५.२००१ रोजी आकस्मिक निधन झाले त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्याकरिता सुचना केली. सभागृहांत उपस्थित सर्वांनी दोन मिनिटे उभे राहून श्री. बा. ना. दियेवार यांना मुक श्रध्दांजली अर्पण करावी असे बँकेचे अध्यक्ष महोदय यांनी आवाहन केले. त्यानुसार सभागृहांत उपस्थित सर्वांनी दोन मिनिटे उभे राहुन श्री बा. ना. दियेवार यांना श्रध्दांजली वाहिली. व खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यांत आला.

-दु:खवट्याचा ठराव -

"स्वातंत्र संग्राम सेनानी श्री बापूरावजी नारायणराव दियेवार बँकेचे माजीसंचालक यांचे ह्रदय विकाराने दिनांक २९.५.२००१ रोजी निधन झाले. त्यांनी बँकेचे संचालक पद सन १९८६ पासून १९९८ पर्यंत भुषविले. त्यांचे निधनामुळे आप्त स्वकियांवर व कुटुंबीयांवर ओढवलेल्या दु:खात आम्ही सहभागी आहोत. त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहोत. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती व सद्गती देवो ही प्रभू चरणी प्रार्थना."

---

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयानुसार सभेचे कार्यवाहीस मा. अध्यक्ष यांनी सुरुवात केली.

विषय क्रमांक १ :- मागील दिनांक ३ एप्रिल २००१ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर चर्चा करतांना मा.श्री. ग. के. शाहिर, संचालक म्हणाले की, बँकेच्या नविन शाखा उघडतांना शक्यतोवर किरायाच्या इमारती न घेता जागा खरेदी करुन

बँकेच्या मालकीची इमारत बांधण्यांत यावी.याकरिता प्राधान्य देण्यांत यावे अशी दुरुस्ती सुचविली.

विषयावर सविस्तर चर्चा होउन मागील दिनांक ३ एप्रील २००१ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करण्यांत आले.

---

विषय क्रमांक २ :- मागील सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने — केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मागील दिनांक ३ एप्रील २००१ रोजीचे सभेत पारीत झालेल्या ठराव क्रमांक ६ व ७ बाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीबाबत टिपणीत माहिती दिली नसल्याचे मा०श्री. र. व्यं. निमजे, संचालक यांनी सांगितले. यावर मा० सरव्यवस्थापक यांनी मागील सभा दिनांक ३ एप्रील २००१ रोजीचे सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची थोडक्यांत माहिती सभेला दिली. विषयावर चर्चा होउन कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीबाबत दिलेल्या माहितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ३ :- बँकेचे सन २०००-२००१ चे नफातोटा पत्रक व दिनांक ३१ मार्च २००१ रोजीचे ताळेबंद पत्रक मंजूर करणे.

ठराव क्रमांक ३ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. सन २०००-२००१ चे नफातोटा पत्रक व दिनांक ३१ मार्च २००१ रोजीचे ताळेबंद पत्रक याबाबत माननीय सरव्यवस्थापक यांनी सभेला सविस्तर माहिती दिली. विषयावर चर्चा करतांना मा.श्री.र. बो. बेग, संचालक यांनी सन २०००-२००१ या वर्षात बँकेला विक्रमी नफा मिळवून दिल्याबद्दल व दिनांक ३१ मार्च २००१ चे बॅलेन्सशिट प्रमाणे बँकेची स्थिती भक्कम व चांगली असल्याबद्दल बँकेचे अध्यक्ष मा.श्री. सुनील केदार यांचे अभिनंदन केले.

विषयावर सविस्तर चर्चा होउन बँकेचे सन २०००-२००१ चे नफातोटा पत्रक व दिनांक ३१ मार्च २००१ रोजीचे ताळेबंद पत्रक मंजूर करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ४ :- बँकेच्या सन २०००-२००१ मध्ये झालेल्या नफ्याच्या विनियोग बाबत विचार करणे व वार्षिक साधारण सभेला मंजुरीसाठी शिफारस करणे.

ठराव क्रमांक ४ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मा० सरव्यवस्थापक यांनी

सन २०००-२००१ चे नफातोटा पत्रकावरुन या वर्षात बँकेला रुपये ८५१०७७६५.५४ नफा झाल्याचे सांगितले. मागील वर्षीचा शिल्लक नफा रुपये ७०३.५२ धरुन यावर्षी रुपये ८५१०८४६९.०६ नफा विनियोगास उपलब्ध असल्याबद्दल माहिती दिली. व बँकेचे नफ्याच्या विनियोगाबाबत पोटनियम क्रमांक ५८ मध्ये असलेल्या तरतुदीबाबतची माहिती सभेला दिली.

विषयावर सविस्तर चर्चा होउन विनियोगासाठी यावर्षी उपलब्ध असलेल्या नफ्याच्या विनियोग करणेबाबत मा० अध्यक्ष महोदय यांना अधिकार देण्यांत यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ५:. बँकेचे सन २०००-२००१ च्या वार्षिक साधारण सभेची तारीख ठरविणे.

ठराव क्रमांक ५:- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयानुषंगाने सभेला माहिती देतांना मा० सरव्यवस्थापक म्हणाले की, बँकेचे उपविधी क्रमांक २३ अन्वये बँकेची वार्षिक साधारण सभा १५ ऑगस्टपूर्वी घ्यावयास पाहिजे किंवा १५ ऑगस्टपूर्वी घेणे शक्य नसल्यास मा० उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचेकडे मुदतवाढीकरिता केलेल्या विनंतीप्रमाणे त्यांनी मंजूरी दिलेल्या मुदतीचे आंत घेणे आवश्यक आहे. मागील वर्षी वार्षिक साधारण सभा मुदत वाढवून न घेता उपविधीत दर्शविलेल्या तारखेचे आंत दिनांक १४ ऑगस्ट २००० ला घेण्यांत आली होती. यावर मा० अध्यक्ष यांनी सांगितले की, यावर्षी सुध्दा बँकेची वार्षिक साधारण सभा घेण्याकरिता मुदतवाढ घ्यायची नाही. उपविधीप्रमाणे असलेल्या १५ ऑगस्टचे आंतच बँकेची वार्षिक साधारण सभा घेण्यात यावी.

विषयावर सविस्तर चर्चा होउन सन २०००-२००१ ची बँकेची वार्षिक साधारण सभा कोणत्या तारखेस घेण्यांत यावी. याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार मा० अध्यक्ष महोदय यांना देण्यांत येत आहे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ६ :- बँकेचे चालु वर्षात झालेल्या खरीप पीक कर्जवाटपाचा आढावा घेणे.

ठराव क्रमांक ६ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. व सभेला माहिती देतांना सांगितले की, सन २००१-२००२ हंगामातील कर्जवाटपास १ एप्रिल २००१ पासून सुरुवात झाली आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुध्दा नाबार्ड व जिल्हा अग्रणी बँक यांचे सहकार्याने तयार करण्यांत आलेल्या क्रेडीट प्लॅननुसार खरीप व रब्बीकरिता रुपये ५३.२८ कोटीचे उद्दिष्ठ ठरविण्यांत आले आहे. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे तीन वर्षातून एकदा क.म.पत्रक तयार करण्याच्या सुचनेनुसार सन १९९९-२००० मध्ये सन १९९९-२००० ते २००१-२००२ पर्यंतचे ३ वर्षाची क.म.पत्रके तयार करण्यांत आली. मागील वर्षी ज्या मर्यादा मंजूर करण्यांत आल्या त्याच मंजुरीच्या आधारावर

चालु वर्षी कर्ज वाटप करायचे आहे. मागील वर्षी रुपये २३४०३.२५ लाखा-ची कमाल मर्यादा पत्रक मंजूर करण्यांत आली. दिनांक १५ मे २००१ अखेर पर्यंत रुपये १६१९.१५ लाखाचे कर्ज वाटप झाले आहे. मागील वर्षीयाच कालावधीत रुपये १४१९.०० लाखाचे कर्ज वाटप झाले होते.

विषयावर चर्चा करतांना मा. श्री र. गो. बंग संचालक म्हणाले की, रुपांतर व पुनर्वसन अंतर्गत कर्जवाटप करण्यांत येत असल्याचे सांगितले परंतु अद्याप कर्जवाटप नाही. यावर मा. अध्यक्ष महोदय यांनी रुपांतर व पुनर्वसन अंतर्गत कर्जवाटप करण्याकरिता तोंडी व लेखी सुचना पाठविल्या असल्याचे सांगितले. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांनी राष्ट्रीयिकृत बँकेकडे असलेल्या प्राथमिक सेवा सहकारी संस्था आपले बँके-कडून कर्ज घेण्यासाठी आपलेकडे ट्रान्सफर करणे संदर्भात कार्यवाही व्हावी अशी सुचना केली. यावर बँकेचे मा० सरव्यवस्थापक यांनी माहिती देतांना सांगितले की, प्राथमिक सेवा सहकारी सोसायटीचे सभासदांकडे असलेली कर्जबाकी आपली बँक स्विकारण्यास तयार आहे. तेव्हा अशी यादी ऑडीटरकडून तपासून प्रमाणित करुन मिळावी.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन चालु वर्षात झालेल्या खरीप पीक कर्ज वाटपाबाबत सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ८ :- बँकेचे अद्यावत कर्जवसुलीचा आढावा घेणे.

ठराव क्रमांक ८ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. व सभेला माहिती देतांना सांगितले की, सन २०००-२००१ मध्ये कर्जाची वसुली प्रभावीपणे करण्याकरिता कृती कार्यक्रम तयार करण्यांत आला. या कार्यक्रमा अंतर्गत संस्थावार सभासदांच्या कर्ज मागणी याद्या, कापूस संकलन केंद्र, ज्वार-खरेदी, साखर कारखाना, कृषि उत्पन्न बाजार समिती इत्यादि ठिकाणी पाठविण्यात आल्या. तसेच ग्रिन कार्ड सर्व कापूस संकलन केंद्रावर उप-लब्ध करुन देण्यांत आले. व कापूस संकलन केंद्रावर कापूस विक्रीचे रकमेतून कर्ज वसुलीकरिता निरिक्षकांच्या ड्युटीज लावण्यात आल्या.

थकबाकीदार सभासदांना कर्जमागणी सुचनापत्रे पाठवून जप्ती-पूर्व नोटीसेस देण्यांत आले. वसुलीचे हंगामात कमीत कमी वेळात जास्तीत जास्त सभासदांचा संपर्क साधता यावा यासाठी प्रत्येक तालुक्याला एक जीपगाडी नोव्हेंबर २००० ते जून २००१ पर्यंत कर्ज वसुलीचे कामाकरिता देण्यांत आली.

सन २०००-२००१ या पिक हंगामांत अपुऱ्या व अकाली पावसामुळे जिल्ह्यातील खरीपे पिके धान, ज्वार, कापूस, सोयाबीन, मिरची या पिकांची परिस्थिती फारसी समाधानकारक नसतानाही वसुलीकरिता जास्तीत जास्त पाठपुरावा करून वसुलीसाठी प्रयत्नशील आहेत. तसेच थकबाकीदारांचे ट्रॅक्टर इत्यादि वाहने जप्तीची मोहीम तिव्र गतीने कार्यान्वित करून व तालुका स्तरावर माहे नोव्हेंबर २००० ते एप्रिल २००१पर्यंत तालुका स्तरावर ८ वसुली रॅली सभा आयोजित करून वसुली करिता पोषक वातावरण तयार करण्यांत आले.

नागपूर जिल्ह्यातील एकूण १६४४ खरीप गावांपैकी ११७५ गावांतील शेती पिक परिस्थिती समाधानकारक नसल्यामुळे ५० पैसे खाली पैसेवारी जाहिर झाली असल्यामुळे चालु शेती कर्जाचे रूपांतर करणेबाबत सुचना प्राप्त झाल्या आहेत. अशा परिस्थितीत सुध्दा वसुलीकरिता पोषक वातावरण निर्माण करून सन २०००-०१ या वर्षात ११ मे २००१ अखेर २८.५१ टक्के कर्जवसुली झाली आहे. मागील वर्षाचे याच काळातील २१.४४ टक्के कर्जवसुली पेक्षा यावर्षीच्या कर्जवसुलीचे प्रमाण जास्त आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन यावर्षीचे बँकेच्या अद्यावत कर्जवसुलीचा आढावा घेण्यांत आला व त्याबाबत सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ८ :- ठेवीवरील व्याजदरांत सुधारणा करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ८ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मा० सरव्यवस्थापक यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, दिनांक २०.३.१९९९ रोजीचे मा. संचालक मंडळाचे सभेतील निर्णयानुसार ठेवीवरील व्याज दरांत सुधारणा करण्यांत आली. व सुधारित व्याज दर दिनांक १.४.१९९९ पासून अमलात आले. सुधारित व्याज दर अमलांत आल्यापासून बँकेचे मुदती ठेवीत एकूण ठेवींच्या प्रमाणांत चांगलीच वाढ झाली व दिवसेंदिवस मुदती ठेवीत वाढ होत आहे. यामुळे कॉस्ट ऑफ डिपॉझिटचा दर वाढण्याची शक्यता आहे. नागरिक सहकारी बँका, राष्ट्रियकृत बँका, व जिल्हा सहकारी बँकांचे ठेवी वरील व्याजदराचा तुलनात्मक तक्ता तयार करून आपले विचारार्थ ठेवण्यांत आला आहे. विषयावर चर्चा करतांना मा० अध्यक्ष म्हणाले की, सद्या संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेचा सरासरी कॉस्ट ऑफ डिपॉझिटचा दर ८.५४ टक्के असून कर्जावरील उत्पन्नाचा सरासरी दर १२.५६ टक्के आहे. तथापी बँकेची कॉस्ट ऑफ फंड ९.९०% असून सकल आर्थिक गाळा ५.६०% इतका पुरेसा असल्यामुळे सद्या असलेला ठेवीवरील व्याज दर आहे तेच राहू द्यावा.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन ठेवीवरील व्याजदरांत कोणताही बदल न करता पूर्वीप्रमाणेच ठेवीवरील व्याजदर कायम ठेवण्यांत यावे असे ठरले.

| | विवरण | व्याज दर (द.सा.द.शे.) |
|---|---|---|
| अ) | चालु ठेव | ०.५० टक्के |
| ब) | बचती ठेव | ५.५० टक्के |
| क) | मुदती ठेव | |
| | १) ३० दिवस ते ९० दिवस | ७.०० टक्के |
| | २) ९१ दिवस ते १८० दिवस | ८.०० टक्के |
| | ३) १८१ दिवस ते १ वर्षाहुन कमी | ९.५० टक्के |
| | ४) १ वर्ष ते २ वर्षाहुन कमी | ११.०० टक्के |
| | ५) २ वर्ष ते ४ वर्षाहुन कमी | १२.५० टक्के |
| | ६) ४ वर्ष आणि त्यावर | १३.०० टक्के. |

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ६ :- अल्पमुदती फेर कर्ज मर्यादेवरील उचलीकरिता दिनांक २८.५.२००१ रोजी घेण्यांत आलेल्या सर्क्युलर ठरावास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ६ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून सन २०००-०१ वर्षाकरिता (जून २००१ पर्यंत) परिपत्रक क्रमांक सीएफए/ओपीआर/एफ-२३/११४१/एसटी एसओ/२०००-०१ दिनांक २२-२३.९.२००० नुसार बँकेला एकूण रुपये २.०० कोटी फेर कर्ज मर्यादा मंजूर झाली आहे. मंजूर असलेल्या रुपये २.०० कोटी अल्पमुदती पीक फेर कर्ज मर्यादेवर महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून चालु हंगामातील पिक कर्ज वाट्या पोटी रुपये १२.०० कोटी उचल घेण्या करिता दिनांक २८.५.२००१ रोजी खालील प्रमाणे सर्क्युलर ठराव करण्यांत आला आहे. दिनांक २८.५.२००१ रोजी करण्यास आलेल्या सर्क्युलर ठरावास मान्यता द्यायची आहे. विषयावर सविस्तर चर्चा होउन दिनांक २८.५.२००१ रोजी खालील प्रमाणे करण्यांत आलेला सर्क्युलर ठराव सर्वानुमते कायम करण्यांत आला.

CIRCULAR RESOLUTION

Resolved that the terms & conditions laid down by the Maharashtra State Coop. Bank Ltd, (Incorporating Vidarbha Coop. Bank Ltd.) Mumbai vide letter No. CFA/OPR/F-23/1141/2000-2001 Dtd 22 Sept 2000 for the SAO. Credit limit of Rs. 2000.00 Lacs (Rs. Two thousand lakhs) only

sanctioned to this bank for financing seasonal agricultural operations under pooled Rate scheme for the year 2000.2001 be and are hereby accepted.

Further, resolved that anyone of the following office bearers from Group 'A' along with anyone officers from Group B' are hereby authorised to sign jointly the documents for the drawals of loan from the limit of Rs. 2000.00 lakhs only sanctioned for short-Term seasonal Agricultural Credit limit for the year 2000-2001.

Further resolved that anyone of the office bearers from Group 'A' alongwith anyone from the following officer from Group 'B' are hereby authorised to sign jointly the undertaking on behalf of the Nagpur District Central Coop. Bank Ltd., Nagpur creating first charge on the pronotes of the Agricultural credit societies as custodian of the said pronotes on behalf of The Maharashtra State Coop. Bank Ltd., (Incorporating Vidarbha Cooperative Bank Ltd.) Mumbai and to endorse the said pronotes on behalf of this Bank in favour of The Maharashtra State Coop. Bank Ltd., (Incorporating the Vidarbha Cooperative Bank Ltd.) Mumbai as Collateral security and to sign the monthly certificate of loan on behalf of this bank.

1. Chairman } Group. 'A'
2. Vice chairman }
3. General Manager Group 'B'

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक १०:- विद्या प्रसारक मंडळ, नागपूर यांना बँक गॅरंटी देणेकरिता घेण्यांत आलेल्या दिनांक २८.४.२००१ रोजीचे सर्क्युलर ठरावास मान्यता देणे.

ठराव क्रमांक १०:- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले, विद्या प्रसारक मंडळ, नागपूर या संस्थेला दिनांक २८.३.२००१ रोजीचे कर्ज उपसमितीचे सभेत झालेल्या निर्णयानुसार त्यांचे वैद्यकिय विभागासाठी मुदती कर्ज मर्यादा, बँक गॅरंटी (बिगर भांडवली) मर्यादा मंजूर करण्यांत आल्या आहेत.

Seen

१. मुदती कर्ज –

अ. पंजाब नॅशनल बँकेकडील संस्थेचे मुदती कर्ज खाते आपल्या बँकेकडे

घेण्यासाठी पंजाब नॅशनल बँकेचे कर्जाची परतफेड करणे करिता रुपये ४२५.०० लाख.

ब) संस्थेचे वैद्यकिय इमारत बांधकाम व वैद्यकिय उपकरणे खरेदीसाठी रुपये २५.०० लाख.

२. बँक गॅरंटी (बिगर भांडवली मर्यादा) -

अ. संस्थेचे मेडीकल कॉलेजला वाढीव ५० सीट मंजुरीपोटी संस्थेच्या वतीने मेडीकल कौंसिल ऑफ इंडियाला पुर्वेच मुदतीची १० टक्के मार्जीन राखून बँक गॅरंटी रुपये १००.०० लाख.

ब. संस्थेच्या वतीने डेंटल कौंसिल ऑफ इंडियाला पंजाब नॅशनल बँकेने दिलेली रुपये १२०.०० लाखाची बँक गॅरंटी सद्यःस्थितीत कार्यरत असल्याने पंजाब नॅशनल बँकेला प्रति गॅरंटी (को गॅरंटी) रुपये १२०.०० लाख.

वरील प्रमाणे कर्जाचे मंजुरीबाबत बँकेचे कर्ज मंजुरीपत्र क्रमांक कर्ज विभाग/बिगर शेती/प्रकल्प/२०००-२००१/८८८ दिनांक २८.३.२००१ नुसार उपरोक्त कर्जाचे सुरक्षिततेकरिता संस्थेनी त्यांची मौजा डिगडोह, तालुका हिंगणा येथील एकूण मुल्य रुपये १०.०७ कोटीची स्थावर व जंगम मालमत्ता बँकेला गहाण करण्याबाबत रजिष्टर करार करुन दिलेला आहे. तसेच कर्ज मंजूरी पत्रातील इतर अटीची पूर्तता करुन मुदती कर्जाची उचल देखील केलेली आहे. त्याप्रमाणे पंजाब नॅशनल बँकेने संस्थेच्या वतीने डेंटल कौंसिल ऑफ इंडियाला दिलेल्या बँक गॅरंटीला आपल्या बँकेने को गॅरंटी दिलेली आहे.

भारत सरकारचे आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाचे पत्र क्रमांक-यु-१२०१२/८८/२०००-एम.ई.पी दिनांक १८.३.२००१ अन्वये शासनाने विद्या शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूर द्वारा संचालीत एन.के.पी. साळवे वैद्यकिय महाविद्यालय व शोध संस्थान नागपूर या महाविद्यालयास पुढील शैक्षणिक सत्र २००१-२००२ पासून अतिरिक्त ५० विद्यार्थ्यांच्या प्रवेशास मंजुरी दिलेली आहे. व त्याकरिता संस्थेला मेडीकल कौंसिल ऑफ इंडियाला रुपये १००.०० लाखाची बँक गॅरंटी देणे आवश्यक असल्याने संस्थेने त्यांचे कार्यकारीणीचे सभेत पारित केलेल्या ठरावाचे अनुषंगाने दिनांक ५।४।२००१ चे विनंती अर्जाद्वारे आपल्या बँकेकडे बँक गॅरंटी देण्याबाबत विनंती केलेली आहे. मेडिकल कौंसिल ऑफ इंडियाला ही बँक गॅरंटी नॅशनलाईज्ड अथवा शेड्युल बँकेकडून देणे आवश्यक असल्याने आपल्या बँकेला महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई यांना को-गॅरंटी देऊन त्यांचेकडून संस्थेला बँक गॅरंटी मिळवून द्यावी लागेल. सदर बँक गॅरंटीकरिता १० टक्के मार्जीन मनीची तरतुद संस्थेने केलेली आहे.

वरील प्रमाणे संस्थेला महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमि., मुंबई यांचेकडून रुपये १००.०० लाखाची बँक गॅरंटी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला आवश्यक असलेले ठराव पाठविणे आवश्यक आहे. बँकेच्या मा. संचालक मंडळाची सभा तत्काळ बोलाविणे शक्य नसल्यामुळे विद्या शिक्षण प्रसारक मंडळाची तातडीची गरज लक्षांत घेता दिनांक २८.४.२००१ रोजी खालील प्रमाणे करण्यांत आलेला सर्क्युलर ठराव सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

सर्क्युलर ठराव

Resolved that -

1) At the request of Vidya Shikshan Prasarak Mandal, Nagpur, a joint & several Counter Guarantee be issued in favour of M.S. Coop. Bank Ltd on behalf of Vidya Shikshan Prasarak Mandal, Nagpur against allotment of additional 50 seats from acedamic year 2000-2001 for Rs. 1.00 Crore (Rs One Crore only) for 5 years. The Bank Guarantee is to be issued by Maharashtra State Coop. Bank. in favour of Medical Council of India.

2) The Maharashtra State Coop Bank Ltd., Mumbai is authorised to debit Current Account No. 96/5751 with them by Rupees One Crore in event of invoking the said Guarantee of Medical Council of India.

3) Any two of the following officials are authorised to sign the counter guarantee.

| Sr. No. | Name | Designation |
|---|---|---|
| 1. | Shri S.C. Kedar | Chairman |
| 2 | Smt. A.C. Mahajan | Vice chairman |
| 3. | Shri R.V. Nimje | Director |
| 4. | Shri A.N. Chaudhary | Genenral Manager. |
| 5. | Shri S.S. Gode | Manager (Officg.) |

4) Any one of the following persons is authorised to counter sign documents issued by the applicant.

| | | |
|---|---|---|
| 1. | Shri A. N. Chaudhary | General Manager |
| 2. | Shri S.S. Gode | Manager (Officg.) |

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ११ : नागपूर जिल्हा शेतकरी सहकारी सुतगिरणी मर्या. हिंगणा यांना मशिनरी खरेदीसाठी एल. सी. सुविधा उपलब्ध करून देणेकरिता घेण्यांत आलेल्या दिनांक २१.५.२००१ रोजीचे सक्युलर ठरावास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ११ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, नागपूर जिल्हा शेतकरी सहकारी सुतगिरणी मर्या. हिंगणा ह्यांनी स्वित्झरलँड येथून अद्यावत मशिनरी खरेदी करायची असल्याने त्या मशिनरीच्या पेमेंटसाठी एल. सी. सुविधा उपलब्ध करून देण्यास विनंती केली आहे. सुतगिरणीची तातडीची गरज विचारात घेउन दिनांक २१.५.२००१ रोजी सक्युलर ठराव घेउन कार्यवाही करण्यांत आली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होउन दिनांक २१.५.२००१ रोजी केलेल्या खालीलप्रमाणे केलेल्या सक्युलर ठरावास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली आहे.

<u>दिनांक २१.५.२००१ रोजी करण्यांत आलेला सक्युलर ठराव.</u>

नागपूर जिल्हा शेतकरी सहकारी सुतगिरणी मर्या. हिंगणा यांना स्वित्झरलँड येथील झोरेला ए. जी. कंपनीकडून "स्विम कॅबीनेट कॉन्टेझर" ही अद्यावत मशिनरी खरेदी करावयाची असून त्याबाबत आवश्यक परवानगी चे कार्यवाहीस सुतगिरणीचे व्यवस्थापक कमिटीचे सभेत ठराव पारित केला आहे. व त्याप्रमाणे गिरणीने सदर कंपनीला मशिनरीची ऑर्डर दिलेली आहे. सदर मशिनरीची किंमत १४०,०००.०० सी.एच.एफ. म्हणजे भारतीय चलनानुसार रुपये ४०.०० लाख असून ही रक्कम कंपनीला विदेशी चलनात अदा करावयाची आहे. त्यासाठी सुत गिरणीने आपले बँकेमार्फत महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या. मुंबई येथे रुपये ४०.०० लाख लेटर ऑफ क्रेडीट (एल.सी.) सुविधा उपलब्ध करून देणेबाबत विनंती केली आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या. मुंबई येथील आय.बी.डी. विभागाने दिलेल्या माहितीनुसार मशिनरी खरेदीच्या किंमती इतक्या रकमेचे एल.सी. खाते गिरणीच्या नावाने उघडावे लागेल. याकरिता जिल्हा सहकारी बँकेला रुपये ४०.०० लाख रकमेची गॅरंटी द्यावी लागेल. तसेच मशिनरी पेमेंटचे वेळी आपले बँकेचे मुंबई येथील चालू ठेव खात्यातून रक्कम उपलब्ध करून द्यावी लागेल.

गिरणीचे सदर मशिनरीचे खरेदीकरिता स्वनिधीतून व्यवस्था केलेली आहे तोपर्यंत तात्पुरती व्यवस्था म्हणून राज्य सहकारी बँकेला वेळीच पेमेंट करता यावे यासाठी गिरणीला मंजूर असलेल्या नाबेगहाण मर्यादेवर मशिनरीची एकूण किंमत रुपये ४०.०० लाख रकमेचे ईयर मार्क करून ठेवावे लागेल.

गिरणीला चालु वर्षाकरिता नाबेगहाण मर्यादा रुपये ६००.०० लाख

दिनांक ३१.३.२००२ पर्यंतचे मुदतीसाठी मंजूर असून या मर्यादेवर कर्जबाकी नाही. संस्थेनी सर्व चार्जेससह मशिनरी खरेदी पोटी होणारी एकूण रक्कम सुतगिरणीचे तारणगहाण कर्ज खात्याला नांवे टाकून वसूल करून घेण्याबाबत दिनांक ५.५.२००७ चे कार्यकारी मंडळाचे सभेतील ठरावान्वये अधिकार दिले आहे.

वरील सर्व बाबी विचारांत घेता नागपूर जिल्हा शेतकरी सहकारी सुत गिरणी मर्या., हिंगणा यांना जिल्हा बँकेने महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या, मुंबई येथे एल.सी. खाते सुरु करून देण्यासाठी हमी घेण्यांत यावी. तसेच सुत गिरणीची निकड लक्षांत घेता गिरणीला मंजूर असलेल्या तारणगहाण मर्यादेमधून विदेशी मशिनरी खरेदीकरिता रुपये ८०.०० लाख तात्पुरती उचल मर्यादा राखून ठेवावी व सुत गिरणीची गरज भागवावी. याशिवाय सदर सुविधेकरिता राज्य सहकारी बँकेला आवश्यक असणारा ठराव पाठविणे आवश्यक आहे.

बँकेच्या मा० संचालक मंडळाची सभा तत्काळ बोलाविणे शक्य नसल्याने सुतगिरणीची तातडीची गरज लक्षांत घेता यासाठी खालील प्रमाणे करण्यांत आलेला सर्क्युलर ठराव सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

Resolved that :-

1) At the request of Nagpur Zilla Shetkari Sahakari Soot Girni Ltd., Hingna a joint and several guarantee be issued in favour of the Maharashtra State Cooperative Bank Ltd., Mumbai against the documentary Credit to be issued by the letter for the rupees equivalent of 140000 CHF (In words one lakh forty thousand CHF) at the rate of exchange applicable for retirement of bills there under.

2). The Maharashtra State Coop. Bank Ltd., Mumbai is authorised to debit Current Account No. 96/5751 with themselves by Rupee equivalent of the bill amount, charges and interest if any incurred under the documentary credit.

3.) Any two of the following persons are authorised to sign guarantee, counter guarantee, status report on applicant and instructions for issue of the documentary credit.

| Sr.No. | Name | Designation |
| --- | --- | --- |

| | | |
|---|---|---|
| 1. | Shri B.C. Shahane | Director |
| 2 | Shri R.V. Nimje | Director |
| 3. | Shri A.N. chaudhary | General Manager. |
| 4. | Shri S. S. Gode | Manager (Officg) |

4) Anyone of the following persons is authorised to countersign documents issued by the applicant for the credit

| | | |
|---|---|---|
| 1. | Shri A.N. chaudhary | General Manager. |
| 2. | Shri S. S. Gode | Manager (Officg) |
| 3. | Shri S. B Nilcam | Chief officer. |

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ९२ :- बँकेचे उपविधी क्रमांक ९३(ii), १७, २६(xix) व ३९, ५३(ii) आणि ५५(ई)(i) मध्ये दुरुस्ती करणेकरिता विचार करणे.

ठराव क्रमांक ९२ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, कर्जदार संस्थावरील हिस्से खरेदीचा भार कमी करण्याच्या उद्देशाने बँकेत हिस्से गुंतवणुकीची मर्यादा कमी करण्याकरिता उपविधी क्रमांक ९३(ii) मध्ये, मा० सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिलेल्या निर्देशानुसार दुरुस्तीकरिता उपविधी क्रमांक १७ मध्ये, मा० कर्ज उपसमितीचे सदस्यांची संख्या वाढविण्याकरिता उपविधी क्रमांक २६(xix) मध्ये, मा० व्यवस्थापक समितीची सदस्य संख्या कायम ठेवून पगारदार सहकारी सोसायटीचा एक संचालक कमी करणेकरिता उपविधी क्रमांक ३९ मध्ये, नाबार्डकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या निर्देशानुसार कर्ज वितरणासाठी उपविधी क्रमांक ५३(ii) मध्ये दुरुस्त्या करायच्या आहेत आणि कर्ज वसुली नियमित भरणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणेसाठी व कर्जवसुली वातावरण निर्माण करणेसाठी उपविधी क्रमांक ५३(ई)(i) निर्माण करावयाचा आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेचे उपविधी क्रमांक ९३(ii), १७, २६(xix), ३९, ५३(ii) आणि ५७(ई)(i) मध्ये खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यास मान्यता देण्यांत आली व सदर दुरुस्तीस बँकेचे वार्षिक साधारण सभेची मंजूरी घेण्यांत यावी, असे ठरले.

PROPOSED AMENDMENT

TO BYE-LAWS OF THE BANK.

| Byelaws No. | Wording of Existing Byelaws. | Amendment proposed | Wording of the Bye laws after Amendment | Reason. |
|---|---|---|---|---|
| 13 ii (page No. 7) | Every society shall purchase each year shares of the Bank at least upto 50% of the amount collected by it from its members till the share capital of the society reaches 20% of its borrowings from the Bank. It shall be the discretion of the Managing Committee of the society whether to purchase shares beyond this limit.<br>Provided all societies other than Agricultural credit societies borrowing from the Bank shall take shares of the Bank as stated below:<br>1) Marketing Processing societies and consumers societies 1% of the maximum borrowings.<br>2) Urban Cooperative Bank 2.50% of the limit sanctioned<br>3) All other societies not included above 5% of the maximum borrowing. | Every Primary Agriculture society shall purchase each year shares of the Bank at least upto 50% of the amount collected by it from its members till the share capital of the society in the Bank reaches 5% of its borrowings from the Bank. It shall be the discretion of the managing committee of the society whether to purchase or retain shares beyond this limit.<br>Provided all societies other than Agricultural credit societies borrowing from the Bank shall take shares of the Bank as stated below:-<br>1) Marketing, Processing societies and consumers societies 1% of the Maximum borrowings<br>2) Urban Cooperative Bank 2.50% of the limit sanctioned.<br>3) All other societies not included above 5% of the maximum borrowing. | Every Primary Agriculture society shall purchase each year shares of the Bank at least upto 50% of the amount collected by it from its members till the share capital of the society in the Bank reaches 5% of its borrowings from the bank. It shall be the discretion of the Managing Committee of the society whether to purchase or retain shares beyond this limit.<br>Provided all societies other than Agricultural credit societies borrowing from the bank shall take shares of the bank as stated below:-<br>1) Marketing, Processing Societies and consumers societies 1% of the maximum borrowings.<br>2) Urban Cooperative Bank 2.50% of the limit sanctioned.<br>3) All other societies not included above 5% of the maximum borrowing. | In order to reduce the burden of share purchase by the borrower society. |
| 17 (Page No. 8) | Shares held for not less than one year, can, with the approval of the Board of Directors be transferred from one member to another who is eligible for admission and willing to be admitted as a member but no affiliated society or a share holder may be permitted to alienate in any way any shares belonging to it or him while indebted to the bank. | Shares held for not less than one year can, with the approval of the Board of Directors be transferred from one member to another or to a non member who is eligible for admission and willing to be admitted as a member but no affiliated society or a share holder may be permitted to alienate in any way any shares belonging to it or him while indebted to the Bank. | Shares held for not less than one year. Can, with the approval of the Board of Directors, be transferred from one member to another or to a non ~~ee~~ member who is ~~ııı~~ eligible for admission and willing to be admitted as a member, but no affiliated society or a share holder may be permitted to alienate in any way any shares belonging to it or him while indebted to the bank. | As per directions of Commissioner for Cooperation and Registrar, Cooperative societies, Maharashtra State. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | Notwithstanding any thing contained in this byelaws or any other byelaws, no fresh shares would be issued to the existing individuals members and no new individuals would be admitted to the membership of the bank. | Notwithstanding any thing contained in this byelaws or any other byelaws, no fresh shares would be issued to the individual members and no new individual members inclusive of by way of transfer of shares or automatic transfer of right in the case of deceased members would be admitted to the membership of the bank and the shares of deceased individual members to be refunded as per procedure laid down elsewhere. | Notwithstanding any thing contained in this byelaws or any other byelaws, no fresh shares would be issued to the individual members and no new individual members inclusive of by way of transfer of shares or automatic transfer of right in the case of deceased members would be admitted to the membership of the bank and the shares of deceased individual members to be refunded as per procedure laid down elsewhere. | |
| 26 (xix) (page No. 18) | To Constitute for the purpose of sanctioning loan, a Loan Sub Committee and to delegate powers to the Sub Committee. The Sub Committee shall consists of 9 members of whom the Chairman & Vice chairman shall be the members. Five members shall form a quorum. The Chairman of the Board or in his absence the Vice Chairman shall preside over the meeting of this Committee. In the absence of ~~the~~ both the members present will elect the chairman for the meeting. It shall be competent for the Loan Sub-Committee to authorise the chairman, vice-chairman or any officer of the bank to sanction loan applications, if necessary for expeditious disposal of the loan applications. The sanction, | To Constitute for the purpose of sanctioning loan, a loan Sub-Committee and to delegate powers to the Sub Committee. The Sub Committee shall consists of 11 members of whom the Chairman and vice chairman shall be the members. Six members shall form a quorum. The Chairman of the Board or in his absence the vice chairman shall preside over the meeting of this Committee. In the absence of ~~the~~ both the members present will elect the Chairman for the meeting. It shall be competent for the Loan-Sub-Committee to authorise the chairman, vice chairman or any officer of the bank to sanction loan applications, if necessary, for expeditious disposal of the loan applications. The sanction | To constitute for the purpose of sanctioning loan, a loan-Sub Committee and to delegate powers to the sub-Committee. The Sub-Committee shall consists of 11 members of whom the chairman and vice chairman shall be members. Six members shall form a quorum. The chairman of the board or in his absence the vice chairman shall preside over the meeting of this committee. In the absence of the both the members present will elect the chairman for the meeting. It shall be competent for the loan sub committee to authorise the Chairman, vice chairman or any ~~offer~~ officer of the bank to sanction loan applications, if necessary for expeditious disposal of the loan applications. The sanction | To give adequate representation of Directors representing various categories included from time to time. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | thus accorded by the chairman, vice chairman or the officer, as the case may be, shall be placed before the next meeting of the loan Committee for ratification. | thus accorded by the chairman, vice chairman or the officer, as the case may be, shall be placed before the next meeting of the loan Committee for ratification. | thus accorded by the chairman, vice chairman or the officer as the case may be, shall be placed before the next meeting of the loan Committee for ratification. | |
| 31 (page No. 20) | Board of Directors shall every year in first meeting after 31st March appoint an Executive Committee consisting of not more than 11 Directors as under.<br>1) Chairman<br>2) Vice-chairman<br>3) Four Directors of Agricultural Societies<br>4) One Director from weavers Coop. Societies.<br>5) One Director of Marketing processing Coop. Societies.<br>6) One Director from Salary Earners Societies<br>7) Two Directors from remaining categories.<br>Beside these, Divisional Officer of the Maharashtra State Coop. Bank Ltd. Divisional office, Nagpur The District Dy. Registrar of Cooperative societies, Nagpur and special Auditor (class-I) Cooperative societies (Bank) Nagpur shall be the special invitees to the meeting of Executive Committee.<br>The members of the Executive committee shall as far as possible be so appointed by rotation so as to give representation to each Director. | Board of Directors shall every year in the first meeting after 31st March appoint an Executive Committee Consisting of not more than 11 Directors as under.<br>1) chairman<br>2) Vice chairman<br>3) Four Directors from Agricultural societies.<br>4) One Director from weavers Coop. Societies.<br>5) One Director of Marketing Processing Coop. Societies.<br>6) Three Directors from remaining categories.<br>Beside these Divisional officer of the Maharashtra State cooperative Bank Ltd, Divisional office, Nagpur, The District Deputy Registrar of Cooperative societies, Nagpur, and Special Auditor, (Class-I) Cooperative Societies (Bank) Nagpur, shall be the special invitees to the meeting of Executive Committee.<br>The members of the Executive committee shall as far as possible, be so appointed by rotation so as to give representation to each Director. | Board of Directors shall every year in the first meeting after 31 March appoint an Executive committee consisting not more than 11 Directors as under.<br>1) chairman<br>2) Vice chairman<br>3) Four Directors from Agricultural societies<br>4) One Director from weavers Coop. societies<br>5) One Director of marketing, processing coop. societies.<br>6) Three Directors from remaining Categories.<br>Beside these Divisional officer of the Maharashtra State Coop. Bank Ltd, Divisional office, Nagpur, The District Deputy Registrar of Coop. Societies, Nagpur and Special Auditor (Class-I) Cooperative Societies (Bank) Nagpur shall be the Special Invitees to the meeting of the Executive Committee<br>The members of the Executive committee shall as far as possible be so appointed by rotation so as to give representation to each Director. | To accommodate all categories proportionately and adequately. |
| 53(ii) (page No. 26) | A loan to an Individual members including group of individuals | The Loan may be advanced as per directions issued | The Loan may be advanced as per directions issued | To deploy the surplus funds in the |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | partnership, or proprietary Firms and Cooperative Enterprises shall not exceed Rs.10,00,000/- except in the case of loans against the security of fixed deposit. | by NABARD from time to time to an individual members including group of Individuals, Partnership or Proprietary firms, Company, Corporation, Local Bodies, APMC, Educational Institutions Trusts and Cooperative Enterprises against the security. | by NABARD from time to time to an individual members including group of Individuals, Partnership or Proprietary firms, Company, corporation, Local Bodies, APMC. Educational Institutions, Trusts and Cooperative Enterprises against the security. | non farm sector also. |
| 57(e)(i) page No.28. | — | In terms of section 57(e) of Bye laws of the Bank, Corpus fund by contributing to the extent of 20% of net profit arrived at the end of financial year shall be built up for providing recovery incentive in respect of agricultural loans and advances. In no case relief from the fund is to be given for any other purposes other than specified. The rules governing the terms and conditions for its utilisation shall be framed by the Board of the bank and approval from the Registrar. | In terms of section 57(e) of Bye laws of the Bank, Corpus fund by contributing to the extent of 20% of net profit arrived at the end of financial year shall be built up for providing recovery incentive in respect of agricultural loans and advances. In no case relief from the fund is to be given for any other purposes other than specified. The rules governing the terms and conditions for its utilisation shall be framed by the Board of the bank and approval from the Registrar. | To create recovery atmosphere and to reward suitably to farmers who are regularly repaying the coop loan. |

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ९३:- बँकेचे कामकाज सुरळीत चालण्याचे दृष्टीने कर्मचाऱ्यांच्या जागांची निर्मीती करणे व त्या जागांवर नियुक्ती करणेसाठी मा० सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे परवानगीसाठी प्रस्ताव पाठविणे.

ठराव क्रमांक ९३:- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. व सभेला माहिती देतांना सांगितले की, सन १९९४ ला बँकेच्या ८६ शाखा असतांना एकूण कर्मचारी वर्ग ६४४ होता. त्यावेळी १९९४ ला बँकेच्या अस्तित्वात असलेल्या स्टॉफींग पॅटर्नुसार कर्मचाऱ्यांची आवश्यकता ठरवून मा० सहकार

आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे कर्मचारी भरतीकरिता प्रकरण मंजूरी मिळावी म्हणून पाठविण्यांत आले होते. त्यानुसार मा. सहकार आयुक्त यांचेकडून मिळालेल्या परवानगीनुसार लिपिक श्रेणीतील कर्मचारी नियुक्तीची कार्यवाही करण्यांत आली आहे. चपराशी नियुक्तीकरिता कार्यवाही सुरु आहे. सद्यस्थितीत बँकेच्या ८८ शाखा असून एकुण कर्मचारी वर्ग ६१८ आहे. सन १९९४ ला बँकेच्या ठेवी व कर्ज मिळून रुपये १५५२८.२४ लाखाच्या व्यवहार होता. त्यावेळी कर्मचाऱ्यांची संख्या ६४८ होती. आज २००१ मध्ये बँकेच्या मुख्य कार्यालयासह ८८ शाखा असून बँकेच्या ठेवी व कर्ज मिळून रुपये ८३४३५.५८ लाख व्यवहार आहे व कर्मचारी ६१८ आहे.

मागील १९९४ पासून बँकेच्या व्यवहारांत सतत वाढ झाली आहे. परंतु कर्मचारी वर्ग वाढलेला नाही उलट कमी झालेला आहे, असे दिसून येईल. बँकेने मुख्य कार्यालयांत व शहरांतील ४ शाखा आणि ग्रामीण १ शाखांसह संगणकीकरण करण्यांत आले आहे. बँकेच्या शहरांतील संपूर्ण शाखा व तालुक्याच्या पूर्ण शाखांमध्ये संगणकीकरण करण्याचे बँकेचे विचाराधीन आहे. बँकेचा वाढता व्यवहार व संगणीकरण या बाबत्चा विचार करून खालील प्रमाणे नविन जागा निर्माण करून नियुक्त्या करणे आवश्यक झाले आहे.

बँकेच्या सद्याच्या कर्मचारी वर्ग, आवश्यक कर्मचारी वर्ग व आवश्यक असलेला कर्मचारी वर्ग याबाबत माहिती खालील प्रमाणे आहे.

| श्रेणी | सद्याच्या कर्मचारी वर्ग | आवश्यक कर्मचारी वर्ग | कमी असलेला कर्मचारी वर्ग | पुढील ३ वर्षांत सेवानिवृत्त होणारा कर्मचारी | परवानगी मिळालेल्या नविन शाखा करिता कर्मचारी वर्ग | ५% प्रमाणे रिलिव्हर व्यवस्थेसाठी कर्मचारी वर्ग | कमी असलेला एकुण कर्मचारी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सरव्यवस्थापक | १ | १ | -- | -- | -- | -- | -- |
| व्यवस्थापक | -- | १ | १ | -- | -- | -- | १ |
| मुख्याधिकारी | ३ | ५ | २ | -- | -- | -- | २ |
| उपमुख्याधिकारी | -- | ४ | ४ | -- | -- | -- | ४ |
| अ वर्ग अधिकारी | ३२ | ३७ | ५ | ७ | -- | १ | १३ |
| ब वर्ग अधिकारी | १४९ | १५५ | ६ | १८ | ४ | ८ | ३६ |
| लिपिक/टायपिस्ट | ३०९ | ३४१ | ३२ | ४ | ८ | १७ | ६१ |
| ड्रायव्हर | ६ | ६ | -- | -- | -- | -- | -- |
| चपराशी | ११८ | १६९ | ५१ | ३ | ४ | ८ | ६६ |
| एकुण. | ६१८ | ७१९ | १०१ | ३२ | १६ | ३४ | १८३ |

वरील प्रमाणे शाखा स्तरावर आवश्यक कर्मचारी संख्या निर्धारित करतांना शाखांची वर्गवारी व प्रत्येक शाखेकरिता खालीलप्रमाणे सेवकवर्ग गृहीत धरण्यांत आला आहे.

| ठेवी व कर्ज व्यवहार | शाखेची श्रेणी | शाखेतील कर्मचाऱ्यांची संख्या | | | | | एकूण कर्मचारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अ'वर्ग अधि. शाखा व्यव. | 'ब' वर्ग अधि. शाखा व्यव. | क'वर्ग अधिकारी लेखापाल | लिपिक | चपराशी | |
| अ) रुपये २०.०० कोटी व त्यावरील असलेली शाखा | अ'वर्ग शाखा | १ | -- | १ | ७ | ३ | १२ |
| ब) रुपये १०.०० कोटी ते रु. २०.०० कोटी पर्यंत असलेली शाखा | ब'वर्ग शाखा | -- | १ | १ | ४ | २ | ८ |
| क) रुपये ५.०० कोटी ते रु. १०.०० कोटी पर्यंत असलेली शाखा | क'वर्ग शाखा | -- | १ | -- | ३ | १ | ५ |
| ड) रुपये ५.०० कोटीचे आंतील शाखा | ड'वर्ग शाखा | -- | १ | -- | २ | १ | ४ |

विषयावर सविस्तर चर्चा होऊन वरीलप्रमाणे स्टॅफींग पॅटर्नला मान्यता देण्यांत आली. वरीलप्रमाणे कर्मचाऱ्यांच्या जागा निर्माण करुन नियुक्ती करण्यासाठी आवश्यक ती परवानगीकरिता प्रकरण तयार करुन मा० विशेष लेखा परिक्षक वर्ग-१ सहकारी संस्था, (बँक) नागपूर व मा० विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांचे मार्फत मा० सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे, यांचेकडे पाठविण्यांत यावे. याबाबतीत पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार मा० अध्यक्ष यांना देण्यांत येत आहे. असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १८ :- बिगर शेती कर्ज घेतेवेळी होणाऱ्या नाममात्र सभासदांना नाममात्र सभासदत्व मंजूर करणे.

ठराव क्रमांक १८ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०च्या कलम २४ व बँकेचे उपविधीतील कलम ९(६) अन्वये नाममात्र सदस्य (Nominal Member) करुन घेण्याची तरतुद आहे. अशा नाममात्र सभासदांकडून प्रवेश फी म्हणून रुपये १०/- आकारुन त्यांना नाममात्र सभासद करुन घेण्यात येते. अशा सर्व नाममात्र सदस्यांच्या सदस्यत्वाला मा० संचालक मंडळ/व्यवस्थापक समितीचे स्विकृतीने मान्यता प्रदान करण्येत येईल.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेचे नाममात्र सभासद होऊन बिगर शेती कर्ज घेणाऱ्या सभासदांची गरज व मा० संचालक मंडळ/व्यवस्थापक समितीचे सभेत नाममात्र सभासदत्वास स्विकृती मिळण्याकरिता

होणारा विलंब विचारात घेता उपविधिप्रमाणे निर्धारित फी आकारून घेण्यानाममात्र सभासदांचे नाममात्र सभासदत्वाला मान्यता प्रदान करण्याचे अधिकार मा० अध्यक्ष महोदय यांना देण्यात यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ७५ :- मा० अध्यक्ष यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषयावर चर्चा करणे

विषय क्रमांक ७५ (१) :- अज्ञानाचे जमिनिच्या तारणावर कर्ज मंजुरीचे सध्या अस्तित्वात असलेल्या धोरणांत बदल करणेबाबत.

ठराव क्रमांक ७५ (१) :- मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, जिल्ह्यातील सेवा सहकारी संस्थांचे जमिनधारक सभासदांना त्यांचे जमिनीचे तारणावर शेती विकास किंवा किंवा अन्य शेती कारणाकरिता संस्थांचे मार्फत कर्ज दिल्या जाते. जमिनधारक अज्ञान असल्यास त्याचे पालन कर्तास सभासद करून घेतल्यानंतर अज्ञानाचे जमिनिवर अज्ञान पालन कर्तास कर्ज मिळू शकते. अज्ञानाचे नैसर्गिक पालन कर्ते (आई/वडील) नसल्यास अज्ञान पालन कर्तास मे० जिल्हा सत्र न्यायाधिश यांचेकडून अज्ञानाचे वतीने अज्ञानपालन कर्ता प्रमाणपत्र (Guardian Certificate) मिळवावे लागते. याशिवाय (सदर प्रमाण पत्राशिवाय) सर्व अज्ञान पालन कर्तास जमिनिचे तारणावर संस्थेकडून कर्ज घेण्यास मा० जिल्हाधिकारी प्रांत अधिकारी किंवा मेहरबान कोर्टाची परवानगी मिळवून त्या आधारे नोंदविलेला इकरार दाखल केल्यानंतर असा कर्ज पुरवठा केल्या जातो असे सध्याचे धोरण आहे अज्ञानाचे जमिनिवर त्याचे नैसर्गिक पालनकर्ते आईवडील यांना शेती विकासाकरिता द्यावयाचे कर्ज संदर्भात परवानगी प्राप्त करण्यास शासन दरबारी बराच वेळ लागतो. त्यामुळे त्यांना वेळेवर कर्ज उपलब्ध होऊ शकत नाही. अज्ञानाचे जमिनिवर कर्ज उपलब्ध होणेकरिता येणाऱ्या अडचणी विचारांत घेता धोरणात्मक बदल करण्यांत यावा, असे वाटते.

विषयावर सविस्तर चर्चा होउन अज्ञानाचे जमिनिवर कर्ज मिळणेकरिता परवानगी प्राप्त करण्यासाठी शासन दरबारी होणारा विलंब व त्यामुळे येणारी अडचणी विचारात घेवून खालिल प्रमाणे धोरण ठरविण्यांत यावे असे ठरले.

१. अज्ञानाचे जमिनिवर अज्ञान पालनकर्ते म्हणून फक्त आई किंवा वडील यानांच कर्ज मिळू शकेल याकरिता अज्ञानाचे पालनकर्ते त्याचे आई किंवा वडील हेच आहेत. त्याबाबत तलाठ्याचे किंवा रेव्हेन्यू ईन्स्पेक्टरचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. तसेच अज्ञानाचे नैसर्गिक पालनकर्त्यांनी ते अज्ञानाचे

असल्याबाबत तहशिलदार, कार्यकारी दंडाधिकारी (Executive Magi-strate) समोर केलेले शपथपत्र (Affidavit) पालनकर्ता असल्याचे प्रमाण-पत्रासोबत बँकेला सादर करावे लागेल.

२. नैसर्गिक पालनकर्ता व्यतिरिक्त पालनकर्तास अज्ञानाचे पालनकर्ता म्हणून मा. जिल्हा सत्र न्यायाधिश यांचेकडे अर्ज करुन अज्ञानाचे वतीने प्रथम अज्ञानपालनकर्ता प्रमाणपत्र (Guardian Certificate) मिळवावे लागेल. याशिवाय जमिन तारण ठेवून त्या आधारे संस्थेकडून कर्ज घेण्यास मा. जिल्हाधिकारी प्रांत अधिकारी अथवा शासकीय अधिकारी किंवा मेहरबान कोर्टाची परवानगी मिळवून त्या आधारे नोंद किंवा इकरार दाखल केल्यानंतरच असा कर्ज पुरवठा केला जाईल.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ७५(२) : बँकेच्या कोणत्याही बांधकामाबाबत अथवा इतर कामाचे रूपये २.०० लाखाचे वरील कामाचे कोटेशन ऐवजी निविदा (Tender) मागविणे बाबत निर्णय घेणे.

ठराव क्रमांक ७५(२) : मा. अध्यक्ष यांनी विषयानुषंगाने सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेत वेळोवेळी करण्यांत येणाऱ्या इमारत बांधकाम, नविन बांधकाम इमारत दुरुस्ती, स्टेशनरी खरेदी, संगणक साहित्य खरेदी इत्यादि प्रकारच्या कामाकरिता टेंडर/कोटेशन मागविण्यांत येत असतात. तथापि अती आवश्यक अथवा घाईचे वेळी अंदाजपत्रकाप्रमाणे कोटेशन बोलावून कामे केली जाण्याची शक्यता असते अशावेळी अंकेक्षणांत दोष दाखविले जातात. अंकेक्षणांत कोणताही प्रकारचे आक्षेप येवू नये म्हणून रुपये २.०० लाखापेक्षा जास्त खर्चाचे इमारत बांधकाम, इमारत दुरुस्ती इत्यादि करिता स्थानिक वर्तमान पत्रांत जाहिरात देवुन टेंडर (Tender) मागवून आणि स्टेशनरी खरेदी, संगणक साहित्य इत्यादि खरेदी करणेसाठी स्थानिक वर्तमान पत्रांत जाहिरात देवुन कोटेशन (Quotation) मागवून आवश्यक कार्यवाही पूर्ण करावी लागणार आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होवुन रुपये २.०० लाखापेक्षा जास्त खर्चाचे इमारत दुरुस्ती, बांधकाम, नविन इमारत बांधकाम इत्यादि कामाकरिता स्थानिक वर्तमान पत्रांत जाहिरात देवुन टेंडर/कोटेशन मागविण्यांत यावे तसेच संगणक साहित्य, स्टेशनरी इत्यादि खरेदी करणेसाठी स्थानिक वर्तमान पत्रांत जाहिरात देवुन टेंडर/कोटेशन मागविण्यांत यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ७५(३) :- विदेशातून कापूस गाठी आयात करण्यासाठी नागपूर जिल्हा शेतकरी सहकारी सुतगिरणी मर्या. हिंगणा यांना महाराष्ट्र राज्य सहकारी बँक येथे एल.सी.सुविधा उपलब्ध करून देणे संबंधात दिनांक २५.५.२००१ रोजी केलेल्या सक्युलर ठरावास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ७५(३) :- मा. अध्यक्ष यांनी विषयानुषंगाने माहिती देतांना सांगितले की, नागपूर जिल्हा शेतकरी सहकारी सुतगिरणी मर्या; हिंगणा यांनी अमेरिका येथील विदेशी कंपनीकडून कापूस गाठी खरेदी करण्याकरिता मे. वुमेन हिंड अँड कंपनी व मे. कॉलकॉट या कंपन्याशी करार केलेला आहे. या कापूस गाठीचे पेमेंट करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मुंबई येथे सुतगिरणीने एल. सी. सुविधा उपलब्ध करून देण्यास विनंती केली आहे. याकरिता तातडीची आवश्यकता विचारांत घेऊन दिनांक २५.५.२००१ रोजी खालीलप्रमाणे सक्युलर ठराव करण्यांत आला आहे.

<u>दिनांक २५.५.२००१ रोजीच्या सक्युलर ठराव</u>

नागपूर जिल्हा शेतकरी सहकारी सुतगिरणी मर्या, हिंगणा यांनी त्यांचे दिनांक ४.५.२००१ चे व्यवस्थापक कमेटीचे सभेतील ठराव क्रमांक १०(४) नुसार गिरणीकरिता साउथ अमेरिका येथील साउथ अमेरिका येथील कंपनीकडून कापूस गाठी खरेदी करण्याबाबतचा निर्णय घेतला असून त्यानुसार गिरणीने मे. वुमेन हिंड अँड कंपनी, व मे. कॉलकॉट या कंपन्याशी कापूस गाठी खरेदी करण्याचा करार केलेला आहे. वरीलप्रमाणे केलेल्या करारानुसार कंपनीला खालीलप्रमाणे एकूण ४०० मे.टन कापूस गाठीपोटी एकूण युएस. डॉलर ४१६६६९ म्हणजेच भारतीय चलनांत अंदाजे एकूण रुपये १९५.८४ लाख विदेशी चलनांत कंपनीला अदा करावयाचे आहेत.

| अ. क्र | माल पुरवठा करणारी कंपनी | पुरवठ्याची मात्रा | मालाची यु.एस. डी. मध्ये | किंमत रुपयांत रु.४७ डॉलर अंदाजे लाखांत |
|---|---|---|---|---|
| १. | मे. वुमेन हिंड अँड कंपनी | १०० मे.टन | १०८५७६ | ५१.०३ |
| २ | मे. वुमेन हिंड अँड कंपनी | २०० मे.टन | २०२८२३ | ९४.३३ |
| ३. | मे. कॅलकॉट | १०० मे.टन | १०५२६० | ४९.४८ |
| | एकूण. | ४०० मे.टन | ४१६६६९ | १९५.८४ |

वरीलप्रमाणे माल आयात करण्यासाठी संबंधित कंपनीला विदेशी चलनांत पेमेंट करण्याकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या, मुंबई येथे मालाच्या किंमती एवढे रकमेची एल. सी. सुविधा गिरणीकरिता उपलब्ध करून देण्याबाबत गिरणीने विनंती केलेली आहे.

गिरणीला आयात करावयाच्या मालाचे किंमती एवढया रकमेची म्हणजे रुपये १९५.८४ लाखाची एल. सी. सुविधा उपलब्ध करण्यासाठी आपल्या बँकेला

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला एल.सी. पोटी अदा करावयाची रक्कम आपले बँकेच्या मुंबई येथिल राज्य सहकारी बँकेतील करंट खात्यातून वळती करण्याचे अधिकार द्यावे लागतील. गिरणी सदर मालाचे पेमेंट स्वनिधीतून करणार आहे. परंतु तात्पुरती व्यवस्था म्हणून राज्य बँकेला ताबडतोब पेमेंट करण्याचे दृष्टीने गिरणीचे आपले बँकेतील तारणगहाण कर्ज खात्यातून अथवा करंट खात्यातून ही रक्कम परस्पर अदा करण्यास बँकेला अधिकार दिलेले आहेत.

वरील बाबी विचारांत घेता नागपूर जिल्हा शेतकरी सहकारी सुतगिरणी मर्या. हिंगणा यांना विदेशातून कापूस गाठी खरेदी करिता महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या. मुंबई येथे एल.सी. सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला वरीलप्रमाणे हमी देण्यांत यावी. तसेच सुतगिरणीचे आपले बँकेतील तारणगहाण कर्ज खात्यावर रुपये २००.०० लाख उचल मर्यादा गोठवून ठेवावी व सुतगिरणीची गरज भागवावी. तसेच बँकेच्या मा. संचालक मंडळाचे सभेला अवकाश असल्यामुळे सदर सुविधेकरिता राज्य सह. बँकेला आवश्यक असलेला खालील प्रमाणे सर्क्युलर ठराव करून कार्यवाही करण्यांत आली आहे. दिनांक २५.५.२००१ रोजी खालील प्रमाणे करण्यांत आलेला सर्क्युलर ठराव कायम करण्यांत येत आहे.

Resolved that :

1. At the request of Nagpur Zilla Shetkari Sahakari Soot Girni Ltd., Hingna a joint and several guarantee be issued in favour of The Maharashtra State Cooperative Bank Ltd., Mumbai against the documentary credit to be issued by the latter for the rupees equivalent of (I) USD 202823 & USD 108576 in favour of Baumann Hinde & Co. Limited & (II) USD 105270 in favour of Calcot, California at the rate of exchange applicable for retirement of bills there under.

2. The Maharashtra State Cooperative Bank Ltd., Mumbai is authorised to debit current account No. 96/5751 with themselves by Rupee equivalent of the bill amount, charges and interest if any incurred under the documentary credit.

3. Any two of the following persons are authorised

to sign guarantee, counter guarantee, status report on applicant and instructions for issue of the documentary credit.

| Sr No. | Name | designation. |
|---|---|---|
| 1. | Shri B.C. Shahane | Director. |
| 2 | Shri R.V. Nimje | Director. |
| 3. | Shri A.N Chaudhari | General Manager. |
| 4. | Shri S.S. Gode | Manager (Officg.). |

4. Anyone of the following persons is authorised to countersign documents issued by the applicant for the Credit.

| Sr No. | Name | designation |
|---|---|---|
| 1. | Shri A.N. Chaudhari | General Manager |
| 2. | Shri S.S. Gode | Manager (Officg) |
| 3. | Shri S.B. Nikam | Chief officer (Officg) |

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ७५(८) :- प्रकल्पांत गेलेल्या जमीनी व घरापोटी मिळालेल्या रकमेचे चेकवर आकारण्यांत आलेल्या कमिशनची रक्कम परत करणे बाबत.

ठराव क्रमांक ७५(८) : मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, प्रकल्पा अंतर्गत गेलेल्या जमिनी व घरापोटी मिळालेल्या नुकसान भरपाईचे चेकच्या रकमेपैकी पूर्ण किंवा कांही रकमा ठेवीच्या रुपांत शाखेत ठेवल्या आहेत अशा चेकचे रकमेवर कमिशन व पोस्टेज आकारु नये असा निर्णय दिनांक १३.२.२००९ रोजीचे मा० संचालक मंडळाचे सभेत ठराव क्रमांक ९(२) प्रमाणे घेण्यांत आला आहे. व त्याप्रमाणे कार्यवाही सुरु आहे. दिनांक १३.२.२००९ पूर्वी उमरेड शाखेत प्रकल्पांत गेलेल्या जमिनी व घरापोटी मिळालेल्या रकमेचे चेक दिनांक २८.१.२००९ ला डिस्काउंट करण्यांत येवून त्यावर रुपये ११३३३/- कमिशन व पोस्टेज आकारण्यांत आलेले आहे. यापैकी ज्यांनी उमरेड शाखेत ह्या रकमेपैकी मुदती ठेवीत रकमा ठेवल्या आहेत अशा ठेवीदारांना त्यांनी मागणी केल्यानुसार रुपये ५०५४/- परत करावे असे उमरेड शाखेची मागणी आली आहे.

प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना घर व जमीनीचे नुकसान भरपाई पोटी मिळालेल्या रकमेचे चेक दिनांक २८.१.२००९ ला डिस्काउंट करुन त्यावर आकारण्यांत आलेले डिस्काउंट कमिशन व पोस्टेज उमरेड शाखेने मागणी केल्याप्रमाणे दिनांक १३.२.२००९ रोजीचे मा० संचालक मंडळाचे सभेत झालेल्या निर्णयानुसार

परत करण्यास कोणतीच हरकत नाही, असे सभेचे मत पडले.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन प्रकल्पांत गेलेल्या जमीन व घराचे नुकसान भरपाई पोटी मिळालेल्या रकमेचे चेक दिनांक २८.१.२००१ ला डिस्काउंट करून त्यावर आकारण्यांत आलेले डिस्काउंट कमिशन व पोस्टेज ज्यांनी त्या चेकचे रकमेपैकी आपले बँकेत मुदती ठेवीत ठेवी ठेवल्या असतील त्यांना माफ करण्यांत यावे. व दिनांक १३.२.२००१ रोजी झालेल्या ठराव प्रमाणे डिस्काउंट कमिशन व पोस्टेज उमरेड शाखेने मागणी केल्याप्रमाणे संबंधीत प्रकल्पग्रस्त खातेदारांना परत करण्यांत यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १५(५) :- बँकेच्या सन २०००-२००१ चे वार्षिक अहवालास मंजूरी देणे.

ठराव क्रमांक १५(५) :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेचे वार्षिक साधारण सभेत ठेवण्याकरिता कार्यालयाने सन २०००-२००१ या वर्षाचा वार्षिक अहवाल तयार केला आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन कार्यालयाने तयार केलेल्या सन २०००-२००१ चे वार्षिक अहवालास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक १५(६) :- मागील आमसभेने मंजूर केलेल्या बँकेच्या सन २०००-२००१ चे अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा ज्या बाबीवर अधिक खर्च झाला त्यास मंजूरी देऊन जादा झालेला खर्च व सन २००१-२००२ चे अंदाजपत्रक वार्षिक साधारण सभेपुढे ठेवण्यास मंजूरी देणे.

ठराव क्रमांक १५(६) :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, मागील आमसभेने मंजूर केलेल्या सन २०००-२००१ चे अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा खालील बाबीवर अधिक खर्च झाला, त्याबाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

(रुपये लाखांत)

| अ.क्र. | खर्चाचा तपशिल | २०००-२००१ मधील अंदाज | २०००-२००१ मध्ये नक्की झालेला खर्च | अंदाजापेक्षा जादा झालेला खर्च |
|---|---|---|---|---|
| १. | विमा | १८.०० | १९.५१ | १.५१ |
| २. | वाहन खर्च | २७.०० | २८.३८ | १.३८ |
| ३. | अवक्षयन | १७.०० | ६३.९६ | ४६.९६ |
| ४. | वार्षिक आमसभा | १.०० | १.०५ | ०.०५ |
| ५. | किरकोळ खर्च | ५०.०० | ५६.०६ | ६.०६ |
| | एकूण | १११.०० | १६८.९६ | ५५.९६ |

तसेच कार्यालयाने सन २००१-२००२ चे तयार केलेले अंदाजपत्रक वार्षिक साधारण सभेत ठेवून मंजुरी घेणेकरिता शिफारस करणेसाठी सभेसमोर आणले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागील आमसभेने मंजूर केलेल्या सन २०००-०१ चे अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा वरील प्रमाणे ५ बाबीवर रुपये ५६:८५ जादा झालेल्या खर्चास तसेच सन २००१-२००२ चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली. सन २०००-२००१ चे अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेला खर्च व सन २००१-२००२ चे अंदाजपत्रक सन २०००-२००१ चे वार्षिक साधारण सभेत मंजुरीसाठी ठेवण्यांत यावे, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

मा. अध्यक्ष यांचे परवानगीने झालेल्या चर्चेत मा. श्री. र. गो. बंग संचालक म्हणाले की, शेतकऱ्यांना त्यांचे हिस्से रकमेवर लाभांश दिला जावा. यावर मा. अध्यक्ष यांनी सांगितले की, बँकेच्या सेवा सहकारी संस्था ह्या सभासद असल्यामुळे सेवा सहकारी संस्थांना त्यांचे शेअर्स प्रमाणे लाभांश देण्यात येतो. शेतकरी आपल्या बँकेचे सभासद नसून ते सेवा सहकारी संस्थेचे सभासद आहेत. तथापी ह्या सभासदांचे सोसायटी स्तरावर शेअर्सचा हिशेब बरोबर राहत नाही म्हणून बँकेच्या निरिक्षका कडून संस्थेचे शेअर्स रजिस्टर बरोबर लिहिले गेले असल्याबद्दल शहानिशा करून घेतली जात आहे.

यानंतर सभेसमोर कोणतेही विषय नसल्याने सभेला उपस्थित मान्यवरांचे आभार मानून मा. अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

[signature] [signature]

सरव्यवस्थापक अध्यक्ष

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटिव्ह बँक लि; नागपूर.